cmyk






दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

दशमीचे दिवशी अंबा निघे सीमोल्लंघनी हो ।
सिंहारूढ करी शस्त्रे सवळ ती घेऊनी हो ॥
शुभानिशुभांदीक राक्षस सर्वही मारूनी रणी हो ॥
विप्र रामदासा आश्रय दिधला निज चरणी हो ॥

नवरात्रोत्सवानिमित्त सर्व भाविक-भक्तांना हार्दिक शुभेच्छा !

बीड - महाराष्ट्र | वर्ष-५ | अंक-१५७ | गुरूवार, दि.०२ ऑक्टोबर २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने-६ | किंमत ३ रूपये




# शेतकरी कर्जाच्या ओझ्याखाली तर सरकार कागदी घोडे नाचविण्यात दंग

## उद्धव ठाकरे यांची सरकारवर बोचरी टीका

**मुंबई । प्रतिनिधी**

महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी बुधवारी (दि.०१) मुंबईत घेतलेल्या पत्रकार परिषदेत विद्यमान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर जोरदार यांच्यावर जोरदार टीका केली. त्यांनी प्रति हेक्टर ५० हजार रुपये, कर्जमाफी आणि सातबारा कोरा करण्याची मागणी केली. तसेच शेतकऱ्यांच्या उसाच्या बिलातून पूरग्रस्तांसाठी पैसे उभारण्यालाही त्यांनी विरोध दर्शवला. फडणवीस यांनी विरोधी पक्षनेते असताना लिहिलेल्या पत्राचा दाखला देत ठाकरेंनी ओला दुष्काळ जाहीर करण्याची थेट मागणी केली. सरकार केवळ कागदी घोडे नाचवत असून, शेतकरी कर्जाच्या ओझ्याखाली दबले गेले असल्याचे त्यांनी म्हटले.

ठाकरेंनी सांगितले की, राज्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले आहे. उभ्या पिकांचे मोठे क्षेत्र पाण्यात वाहून गेले, घरातील आवश्यक वस्तू आणि संसाराचे साहित्यही नष्ट झाले. विशेषतः सोयाबीन, कापूस आणि तूर यांसारखी महत्त्वाची पिके पूर्णपणे हातातून गेली आहेत. यामुळे शेतकरी पुरते हतबल झाले असून, ते कर्जाच्या ओझ्याखाली दबले गेले आहेत. त्यांच्या



मदतीसाठी सरकारने शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करावा, संपूर्ण कर्ज माफ करावे आणि प्रति हेक्टर किमान ५० हजार रुपयांची आर्थिक मदत द्यावी, अशी ठाकरेंनी पुन्हा एकदा मागणी केली.

पत्रकार परिषदेत ठाकरेंनी एक जुने पत्र दाखवून फडणवीसांना धारेवर धरले. हे पत्र फडणवीस स्वतः विरोधी पक्षनेते असताना लिहिलेले होते, ज्यात त्यांनी तत्कालीन सरकारला ओला दुष्काळ जाहीर करण्याची मागणी केली होती. आता स्वतः मुख्यमंत्रीपदावर असलेल्या फडणवीसांना त्याच पत्राचा दाखला देत ठाकरेंनी आव्हान दिले, की सध्याच्या परिस्थितीतही राज्यात ओला दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना दिलासा द्या. ते म्हणाले, गेल्या आठवड्यात मी स्वतः अतिवृष्टीग्रस्त भागांची पाहणी केली, लोकांशी बोललो आणि सरकारला राजकारण न करता मार्ग काढण्याची विनंती केली. पण सरकारची अशी काही तयारी दिसत नाही. ठाकरेंनी सरकारच्या नेत्यांवरही थेट निशाणा साधला. ते म्हणाले, मुख्यमंत्री जाहिराती आणि प्रसिद्धीमध्ये व्यस्त आहेत, एक उपमुख्यमंत्री पाकिटावर स्वतःचा फोटो छापण्यात मग्न आहेत, तर दुसरा उपमुख्यमंत्री या समस्यांना अंगच लावत नाही. परिणामी, सामान्य जनता आणि शेतकरी वाऱ्यावर ▶▶ पान २ वर

## थोडक्यात...

### युपीएससीच्या आईएस, आयएससचा निकाल जाहीर

दिल्ली : युनियन पब्लिक सर्व्हिसेस अर्थात युपीएससी अंतर्गत येणाऱ्या इंडियन इकॉनॉमिक सर्व्हिस आणि इंडियन स्टॅटस्टिक्स सर्व्हिसेसच्या परीक्षांचे अंतिम निकाल जाहीर झाले आहेत. देशात आएइएसमध्ये मोहित अग्रवाल नदबईवाला हा पहिला आला आहे. तर ऊर्जा रहेजा दुसऱ्या आणि गौतम मिश्राने तिसरे स्थान पटकावले आहे. दुसरीकडं आयएसएस मधून कशिस कसाना देशात पहिला आला आहे. त्यानंतर, आकाश शर्मा दुसऱ्या स्थानावर असून शुभेंदू घोष याने तिसरे स्थान पटकालं आहे. ज्या उमेदवारांनी ही परीक्षा दिली होती, ते आयोगाच्या अधिकृत वेबसाइट जाऊन आपला निकाल पाहू शकतात. या परीक्षेचा लेखी टप्पा २० जून ते २२ जून २०२५ या कालावधीत आयोजित करण्यात आला होता, तर मुलाखती सप्टेंबर २०२५ मध्ये घेण्यात आल्या होत्या.

### एसटी भाडेवाढीचा निर्णय अखेर रद्द

मुंबईः महाराष्ट्रातील पूर परिस्थिती आणि नागरिकांना दिलासा देण्याच्या दृष्टीने, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने दिवाळीनिमित्त करण्यात येणारी १० टक्के हंगामी भाडेवाढ तत्काळ रद्द करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सूचनेनंतर परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी एसटी प्रशासनाला ही भाडेवाढ मागे घेण्याचे आदेश दिले. दरवर्षीप्रमाणे यंदाही दिवाळीच्या सणासुदीच्या काळात १५ ऑक्टोबर ते ५ नोव्हेंबर या कालावधीत एसटीच्या तिकिट दरामध्ये १० टक्के हंगामी भाडेवाढ जाहीर करण्यात आली होती.

### नागपूर ते चंद्रपूर द्रुतगती महामार्गाला मान्यता

मुंबईः नागपूर ते चंद्रपूर या २०४ किलोमीटर लांबी असलेल्या चार पदरी सिमेंट कॉंक्रीट महामार्गाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली वर्षा निवासस्थानी झालेल्या मंत्रिमंडळ पायाभूत सुविधा समितीच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. तसेच चंद्रपूर ते मूल दरम्यान महामार्ग निर्मितीचा प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिल्या. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी, भविष्यामध्ये कुठलाही रस्ता बांधताना रस्त्याच्या परिसरात विकासाची ' इकोसिस्टीम' निर्माण करण्यात यावी. त्यासाठी आधीपासूनच भूसंपादन करून नियोजन करण्याचे निर्देशही दिले.

### पैठणच्या शेतकऱ्याने जिंकले ५० लाख

मुंबई : महाराष्ट्रातील अतिवृष्टी आणि पूरपरिस्थितीमुळे मराठवाड्यातील शेतकरी हवालदिल झाला असताना, पैठण तालुक्यातील एका साध्या शेतकऱ्याने 'कौन बनेगा करोडपती'(केबीसी) मध्ये कमाल करून सर्वांना प्रेरणा दिली आहे. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील पैठण तालुक्यातील कैलास रामभाऊ कुंटेवाड यांनी अमिताभ बच्चन यांच्या या लोकप्रिय शोमध्ये एकही लाईफलाइन न वापरता तब्बल ५० लाख रुपये जिंकले. सोमवारी (३० सप्टेंबर) प्रदर्शित झालेल्या भागात कैलास यांची ही धक्कादायक कामगिरी दाखवण्यात आली. त्यांनी १४ प्रश्नांची उत्तरं बिनचूक दिली, पण १ कोटी रुपयांच्या १५ व्या प्रश्नासाठी गेम सोडण्याचा निर्णय घेतला.

### मनुस्मृती दहन करून आरएसएस विसर्जित करा

वर्धाः संविधानाने सर्व जाती धर्माच्या लोकांना, महिलांना व्यक्ती स्वातंत्र्य, विचार स्वातंत्र्य, अभिव्यक्ती स्वातंत्र्य देत सर्व क्षेत्राची दारे उघडी केली आहेत. पण भाजपाच्या राजवटीत संविधानाची पायमल्ली केली जात आहे. गरीब अधिक गरीब तर श्रीमंत अधिक श्रीमंत करण्याची व्यवस्था भाजपा केली असून त्याचे मुळ आरएसएस आहे. बहुजन समाजाचे फक्त शोषण सुरु आहे. मुठभर लोकांच्या हातात धर्मसत्ता व राजसत्ता असावी हे त्यांचे धोरण आहे.

## सुटीची सूचना

**आज दि. २ ऑक्टोबर २०२५ रोजी विजयादशमी निमित्त दै.राज्य लोकतंत्र कार्यालयास सुटी असल्यामुळे उद्या दि.३ ऑक्टोबर २०२५ रोजीचा अंक प्रकाशित होणार नाही, याची वाचक, जाहिरातदार व एजंट यांनी नोंद घ्यावी.**

**-व्यवस्थापक**

# जिल्हापरिषद आणि पंचायत समितीची आरक्षण सोडत ठरली

**मुंबई । प्रतिनिधी**

**जिल्हा परिषद आणि पंचायत समितीची आरक्षण सोडत कधी होणार? असा सवाल करण्यात येत होता. अखेर याबाबतची प्रतीक्षा संपली आहे. जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांसाठी १३ ऑक्टोबरला आरक्षण सोडत असणार आहे. राज्यातील ३२ जिल्हा परिषदा व त्यांतर्गतच्या ३३६ पंचायत समितीच्या सार्वत्रिक निवडणुकांकरिता सदस्यपदाचे आरक्षण निश्चित करण्यासाठी १३ ऑक्टोबर २०२५ रोजी आरक्षण सोडत काढण्यात येणार असल्याची घोषणा राज्य निवडणूक आयोगाने केली आहे. त्याचबरोबर नगरपरिषद, नगरपंचायतींची प्रारुप मतदार यादी ८ ऑक्टोबरला प्रसिद्ध होणार आहे.**

संबंधित जिल्हाधिकारी १० ऑक्टोबर २०२५ रोजी वृत्तपत्रांत आरक्षण सोडतीसंदर्भातील सूचना प्रसिद्ध करतील. १३ ऑक्टोबर २०२५ रोजी सोडत काढल्यानंतर प्रारूप आरक्षणाची अधिसूचना प्रसिद्ध केली जाईल. त्यावर १४ ते १७ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत हरकती व सूचना दाखल करता येतील. प्राप्त हरकती व सूचनांचा विचार करून ३ नोव्हेंबर २०२५ रोजी शासन राजपत्रात अंतिम आरक्षण प्रसिद्ध केले जाणार आहेत.नगरपरिषद, नगरपंचायतींची ▶▶ पान २ वर

# शेतकऱ्यांना हेक्टरी ५० हजाराची मदत द्या-आ.रोहित पवार

## बीड तालुक्यातील अतिवृष्टीने नुकसान झालेल्या गावांची केली पाहणी

**बीड । प्रतिनिधी**

**मराठवाड्यासह बीड जिल्ह्यात अतिवृष्टी आणि ओल्या दुष्काळामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून त्यांना हेक्टरी ५० हजार रुपयांची सरसकट मदत करावी, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) गटाचे आमदार रोहित पवार यांनी केली आहे.**

आ.रोहित पवार हे बुधवार दि.(०१) रोजी बीडमध्ये अतिवृष्टीने नुकसान झालेल्या गावांची पाहणी करण्यासाठी



आले होते. त्याअगोदर त्यांनी बीडचे जिल्हाधिकारी यांचसोबत आढावा बैठक घेतली. यावेळी त्यांनी शेतकऱ्यांना हेक्टरी ५० हजार रुपयांची मदत करावी. त्यांना सरसकट नुकसान भरपाई द्यावी. शेतकऱ्यांना मदत करण्याची हेच योग्य वेळ असून शासनाने तात्काळ नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी केली. कपिलधारवाडी येथे जाऊन नुकसान पाहणी केली. याठिकाणी रस्ते,जमीन व डोंगर खचले आहे. जमिनीला मोठ्या भेगा पडल्या आहेत. माळीणसारखी गंभीर घटना घडण्याची शक्यता असल्याने स्थानिक नागरिकांचे जीवन आणि संपत्ती धोक्यात आली आहे. याठिकाणी आ.रोहित पवार यांनी परिस्थितीची पाहणी करत पुनर्वसनाची गरज असल्याचे ▶▶ पान २ वर

# डॉ. तेलतुंबडेंच्या परदेश प्रवासाची मागणी हायकोर्टाने फेटाळली

**मुंबई । प्रतिनिधी**

मानवाधिकार कार्यकर्ते आणि भीमा-कोरेगाव प्रकरणातील संशयित आरोपी डॉ. आनंद तेलतुंबडे यांना शैक्षणिक कामांसाठी ॲमस्टरडॅम आणि ब्रिटनमध्ये जाण्याची परवानगी मुंबई उच्च न्यायालयाने नाकारली. न्यायाधीश अजय गडकरी आणि रणजीतसिंह भोसले यांच्या खंडपीठाने तेलतुंबडे यांना परवानगी देण्याविरुद्ध आपले मत व्यक्त करताना त्यांनी आभासी (व्हर्च्युअल) पद्धतीने व्याख्याने देण्याचा विचार करावा, असे सूचवले.

तेलतुंबडे यांचे ज्येष्ठ वकील मिहिर देसाई यांनी न्यायाधिशांना विनंती ▶▶ पान २ वर

# अजित पवार -शरद पवार यांच्यात तासभर चर्चा

**मुंबई । प्रतिनिधी**

एका राष्ट्रवादीच्या दोन राष्ट्रवादी झाल्यानंतर अधून मधून दोन्ही पवार एकत्र येणार दोन्ही पवार एकाच आहेत अश्या चर्चा नेहमीच राजकारणात चालू असतात मागील काळात साखरसंघाच्या बैठकीत देखील दोघे एकत्र आले होते आता मुंबईत वाय. बी. चव्हाण सेंटर येथे दोन्ही नेत्यांची भेट झाल्याची माहिती आहे. पण राष्ट्रवादीचे दोन्ही गटात एकमेकांच्या विरोधात टोकाचा राजकीय वाद असल्यामुळे या भेटीला जास्त महत्त्व प्राप्त झालं आहे.आणि या भेटीला काही राजकीय चर्चा झाली का याचा तपशील मात्र मिळू शकला नसला तरी चर्चा मात्र राजकीय



वर्तुळात जोरदार सुरु आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, माळेगाव साखर कारखान्याबाबत चर्चा करण्यासाठी दोन्ही नेत्यांची भेट झाली आहे. माळेगावच्या वार्षिक साधारण सभेची तारीख आणि वेळ ठरवण्यासाठी दोन्ही नेत्यांची भेट झाल्याची ▶▶ पान २ वर

# सरकारी कर्मचारी आणि पेन्शनधारकांना दिवाळीपूर्वी ३ टक्के महागाई भत्ता

**नवी दिल्ली । वृत्तसंस्था**

केंद्र सरकारी कर्मचाऱ्यांसाठी आणि पेन्शनधारकांसाठी दिवाळीपूर्वी एक मोठी आनंदाची बातमी मिळण्याची शक्यता आहे. केंद्रीय मंत्रिमंडळ लवकरच महागाई भत्यात ३ टक्क्यांनी वाढ करण्यास मंजुरी देण्याची शक्यता आहे.

दिवाळीचा सण तोंडावर असताना, केंद्र सरकारच्या कर्मचाऱ्यांना आणि पेन्शनधारकांना महागाई भत्ता वाढीची उत्सुकता लागली होती. टाईम्स ऑफ इंडियाने दिलेल्या वृत्तानुसार, आजच्या नियोजित मंत्रिमंडळ बैठकीत अंतिम निर्णय होऊ शकतो. सरकारकडून दरवर्षी जानेवारी आणि जुलै मध्ये महागाई भत्ता आणि महागाई सवलत मध्ये द्वैवार्षिक सुधारणा केली जाते, जेणेकरून कर्मचारी आणि निवृत्त लोकांना महागाईच्या वाढत्या दरापासून संरक्षण मिळू शकेल. यावर्षी सप्टेंबरच्या अखेरीस घोषणा आणि ऑक्टोबरच्या सुरुवातीस थकबाकी देण्याची प्रथा असताना, अधिसूचनेत थोडा विलंब झाला होता. या विलंबाबद्दल कॉन्फेडरेशन ऑफ सेंट्रल गव्हर्नमेंट एम्प्लॉईज अँड वर्कर्सने ▶▶ पान २ वर

# विदर्भात पावसाचा जोर वाढण्याची शक्यता

## मराठवाडा आणि मध्य महाराष्ट्रातील काही भागातही पावसाचा अंदाज

**पुणे । प्रतिनिधी**

**राज्यातील काही भागात हलक्या ते मध्यम पाऊस हजेरी लावत आहे. मात्र बहुतांशी भागात पावसाची उघडीप आहे. गुरूवारपासून विदर्भातील काही भागात पावसाचा जोर वाढण्याची शक्यता आहे. मॉन्सूनचा परतीचा प्रवास बुधवारीही थबकला होता.**

विदर्भातील नांदेड, यवतमाळ, नागपूर, भंडारा, गोंदीया, चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्ह्यात काही ठिकाणी जोरदार पावसाची शक्यता आहे. तर मराठवाडा आणि मध्य महाराष्ट्रातील इतर जिल्ह्यांमध्ये काही ठिकाणी ढगाळ हवामानासह हलक्या ते मध्यम पावसाचा अंदाज देण्यात आला. शुक्रवारी आणि शनिवारी विदर्भातील सर्वच जिल्ह्यांमध्ये काही ठिकाणी हलक्या ते जोरदार पावसाचा ▶▶ पान २ वर

# श्री क्षेत्र भगवानगड ट्रस्टला वन विभागाची ४ हेक्टर जागा प्रदान

## देवेंद्र फडणवीस यांची घोषणा; धनंजय मुंडे यांचा यशस्वी पाठपुरावा

**मुंबई । प्रतिनिधी**

श्री क्षेत्र भगवानगड ट्रस्ट परिसरातील वन विभागाची ४ हेक्टर जमीन भक्त निवास, रुग्णालय, प्रशिक्षण केंद्र आदींच्या उभारणीसाठी केंद्र सरकारकडून उपलब्ध करून देण्यात आली असून याबाबतची अधिसूचना केंद्रीय पर्यावरण व वन विभागाने प्रसिद्ध केली आहे.माजी मंत्री आमदार धनंजय मुंडे यांनी यासाठी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या माध्यमातून सातत्याने पाठपुरावा केला होता, त्यास भगवान गडाच्या



स्थापना दिनाच्या पूर्व संध्येस यश आले आहे. गडाचे महंत न्यायचार्य डॉ. नामदेव शास्त्री यांनी अनेक वर्षांपासून ▶▶ पान २ वर

# आधार अपटेडसाठी आता जास्तीचे पैसे मोजावे लागणार

## १ ऑक्टोबरपासून झाले नवीन बदल लागू

**मुंबई । प्रतिनिधी**

आधार कार्ड हे भारतीय नागरिकांसाठी एक महत्त्वाचे ओळखपत्र आहे. कोणत्याही सरकारी योजनेचा लाभ घेण्यासाठी ते अनिवार्य आहे. हे कार्ड युनिक आयडेंटिफिकेशन अथॉरिटी ऑफ इंडिया द्वारे जारी केले जाते. आधार कार्डशी संबंधित कोणतेही अपडेट युआयडीएआयच्या माध्यमातूनच केले जाते. १ ऑक्टोबरपासून आधार अपडेटसाठी नवीन शुल्क लागू केले आहे.

नियमांनुसार, नवीन आधार कार्ड बनवणे हे सर्वांसाठी विनामूल्य (मोफत) आहे. नागरिक त्यांच्या जवळच्या




आधार सेवा केंद्रात जाऊन आपले आधार कार्ड बनवू शकतात. मात्र बायोमेट्रिक अपडेटसाठी १ ऑक्टोबरपासून नवीन शुल्क लागू केले आहेत. या नवीन बदलांनुसार, बायोमेट्रिक अपडेट (उदा. फिंगरप्रिंट, डोळ्यांची आयरीस किंवा फोटो बदलणे) ▶▶ पान २ वर

### लहान मुलांसाठी प्रथम बायोमेट्रिक अपडेट मोफत

५ ते ७ वर्षे आणि १५ ते १७ वर्षे वयोगटातील मुलांचे बायोमेट्रिक अपडेट जर पहिल्यांदा केले जात असेल, तर ते आता मोफत आहे. तथापि, दुसऱ्या वेळेस बायोमेट्रिक अपडेटसाठी १२५ रुपये शुल्क द्यावे लागेल. दरम्यान, १० वर्षे किंवा त्याहून अधिक जुने असलेले आधार कार्ड अपडेट करणे अनिवार्य करण्यात आले आहे. त्यामुळे, जर तुमचे आधार कार्ड १० वर्षांपासून अपडेट झाले नसेल, तर ते त्वरित अपडेट करून घेणे अनिवार्य आहे.

# दसऱ्याला 'झेंडू' भाव खाऊन जाणार



**बीड । प्रतिनिधी**

**खास दस-यासाठी शेतात फुलवलेला झेंडू फुलो-यास असतानाच सततच्या पावसाने शेतातच कुजला आहे. त्यामुळे दसरा सणासाठी अवाक कमी रहाणार असे वाटत होते मात्र बाजरी पेठेत दसऱ्याच्या एक दिवस आधीच झेंडू बाजारात आला आहे आता सुरवातीला १६० ते २०० रुपये किलो दराने झेंडू विकला जात असल्याचे चित्र आहे हा भाव दसऱ्याच्या दिवशी आणखी वाढण्याची शक्यता वर्तवली जात आहे.**

दसरा सणासाठी झेंडूला मागणी वाढली ▶▶ पान २ वर

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.३० सप्टेंबर २०२५

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहूः ८५.०० क्विंटल | २,३०० | २,८०१ | २,५६६ |
| ज्वारी/हायब्रिड : १००.०० क्विंटल | २,१०१ | ३,०३८ | २,४७५ |
| मका/लोकलः५.०० क्विंटल | २,१७५ | २,१७५ | २,१७५ |
| तूर : १४.५० क्विंटल | ६,२०० | ६,२५१ | ६,२३३ |
| उडीद : ६१.०० क्विंटल | ३,९०१ | ५,५०० | ५,०२० |
| बाजरीः ७३.५० क्विंटल | २,१५० | २,९३० | २,६११ |
| मुगः १०.०० क्विंटल | ४,८०० | ६,५५० | ५,५९५ |
| सोयाबीनः १७.०० क्विंटल | ४,००१ | ४,४०० | ४,१८५ |
| हरभराः ८.५० क्विंटल | ४,४०० | ६,४०१ | ५,०३३ |

cmyk

## अग्रलेख

# बळीराजाच्या अश्रूंचा पूर आला

मे महिन्यापासून वरुणराजाने हजेरी लावली अन् शेतकरी समाधानी झाला. मात्र, मागिल आठवड्यापासून वरुणराजा कोसळला आणि बळीराजाच्या अश्रूंचा पूर वाहू लागला आहे. गावोगावचे ओढे तुडुंब नव्हे ओसंडून वाहू लागले. मागिल अनेक वर्षांपासून ज्या गावात कधी ओढ्याला कधी पाणी आले ते तुडुंब वाहिले. शेतातील पिके वाहून गेली, गुरेढोरे वाहून गेली, अन् बळीराजाच्या अश्रूंचा बांध फुटला. म्हातारे आई-वडिल कच्चेबच्चे उपाशीपोटी झोपले. मंत्री जागे झाले अन् शेतात बांधावर गेले, मदत करू म्हणाले, पण अजून कशात काय फाटक्यात पाय अशी अवस्था मराठवाड्यातील शेतकऱ्यांची झाली आहे.

माजी केंद्रीय कृषिमंत्री शरद पवार यांनी राज्यकर्त्यांना सबुरीचा सल्ला दिला, प्रशासनाला काम करू द्या, शक्य तेवढ्या लवकरच शेतकऱ्यांना मदत करा असा सबुरीचा सल्ला दिला. मुख्यमंत्र्यांनी सांगितले मदत देतो, तेव्हा एका शेतकऱ्याने विचारले किती मदत देणार ते जाहीर करा, तर मुख्यमंत्री महोदय भडकल्याचे वाहिन्यांवर पाहायला मिळाले. आता शेतकऱ्यांनी प्रश्नही विचारायचा नाही का, अशी परिस्थिती निर्माण झाली. एका ठिकाणी मुख्यमंत्री महोदय म्हणाले बाबा राजकारण करू नको, तर शेतकरी म्हणतात तुम्हीच सांगा राजकारण कोण करत आहे. फोटो आणि बातम्या फटाफट कोण प्रसिद्ध करत आहे, हे तपासण्याची गरज आहे. मागिल आठवड्याभरापासून झालेल्या पावसामुळे शेतकऱ्याची घालमेल झाली आहे. पुराच्या पावसामुळे शेतीतील पीकच नाही, तर शेतातील ज्या मातीमध्ये पीक घेतो, ती मातीत वाहून गेल्यामुळे पुढील काळात शेती करायची तरी कशी असा प्रश्न शेतकरी राजाला पडला आहे. कर्जाच्या बोज्याखाली अगोदरच दबलेला शेतकरी राजा या पुराच्या पावसामुळे देशोधडीला लागला आहे. शेतात पाणी, घरात पाणी, जनावरांच्या गोठ्यातही पाणीच पाणी झाले आहे. घरातील चीजवस्तू पाण्यात भिजल्याने मोठे नुकसान झाले आहे. रस्ते, ओढ्यानाल्यावरून पूल पाण्यात वाहून गेले आहेत. अनेक गावांचा संपर्क तुटला आहे. बळीराजाचा संपूर्ण संसार उघड्यावर पडलेला आहे. शासन त्यांच्या दुःखावर मीठ चोळण्याचे काम करीत आहे. ज्याचे घर दोन दिवस पाण्यात राहिलेले आहे अशाच शेतकऱ्याला नुकसान भरपाई म्हणून आठ हजार रुपये, तर घरातील पशुधन वाहून गेले असेल मृत्युमुखी पडले असेल, तर त्याला ३८ हजार रुपये इतकी कमी रक्कम नियमाप्रमाणे मिळणार आहे. तसेच घरातील कोणती व्यक्ती दगावली असेल, तर एक लाख रुपये एवढी रक्कम मिळणार आहे. या नियमाला हसावे की रडावे असाच प्रश्न पडला आहे?

काही महिन्यांपूर्वी गुजरात येथे विमान अपघातामध्ये जे प्रवासी मृत्युमुखी पडले त्यांना शासनाकडून एक कोटीची मदत जाहीर झाली. शेतकऱ्यांना प्रश्न पडतो की ती पण माणसं आहेत आणि आम्ही पण माणसं आहेत. बळीराजालाच मदत करताना सरकार नेहमी हात आखडता का घेत आहे. त्याचे मूल्यमापन करताना कोणते निष्कर्ष लावतो, असा सवाल आता उपस्थित होत आहे. विमानात मरणारी माणस आहेत तर पुरात मरणारी माणसं नाहीत का हा संसोधनाचा विषय आहे. मुख्यमंत्र्यांना झोपायला २१ लाखांचा बेड, गरिबांना मदत मात्र कवडीमोलाची वारे गरिबांचे सरकार. जगाचा पोशिंदा म्हणून मिरवणाऱ्या शेतकऱ्यांची किंमत फक्त एक लाख रुपये इतकीच आहे का, त्याच्या जीवनाचं त्याच्या शेतीचं, पशुधनाचं मूल्यमापन काही हजारामध्येच आहे का? महिलांना दीड हजार रुपये लाडकी बहीण योजनेमध्ये मिळतात. ते देण्यासाठी सरकारकडे पैसे आहेत. फ्लेक्स, बॅनर, जाहिरातबाजी करायला पैसे आहेत. मात्र, बळीराजाला मदत करायला कर्ज माफ करायला निधी नाही. मुख्यमंत्री देवेंद्र फडणीवस यांनी मुख्यमंत्री होण्याअगोदर शेतकऱ्यांचे कर्ज माफ करणार असे सांगितले. मात्र, मुख्यमंत्रीपदाचा पाच वर्षांचा कालावधी झाला तरी कर्जमाफीचा अभ्यासच सुरू होता. सत्तांतर झाले उद्धव ठाकरे मुख्यमंत्री झाले, दोन लाख रुपये शेतकऱ्यांचे कर्ज माफ केले. आता देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री झाले. पूर आला लोक, गुरढोरं वाहून केली तरी कर्जमाफीसाठी निकष लावले जात आहे, याला काय म्हणायचे. उद्योजकांचे कर्ज माफ करता, विजय मल्ल्याला मोकाट सोडता हा दुजाभाव कशासाठी करता. विद्यार्थी, शाळकरी मुली मुलांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले आहे, सर्व वह्या, पुस्तक भिजून खराब झालेले आहेत. शाळाची पडझड झालेली आहे. शालेय शिक्षण घेण्यासाठी प्रतिकूल परिस्थिती निर्माण झालेली आहे. याकडे लक्ष द्यायला सरकारला वेळ आहे का. दहावी-बारावीच्या मुला मुलींना बोर्डाचे फॉर्म भरण्यासाठी पैसे नाहीत, कागदपत्रं नाही, त्यांनी अर्ज ऑनलाईन कशा पद्धतीने भरायचा असा प्रश्न आता निर्माण झालेला आहे. त्यातच राष्ट्रीय बँकांनी आणि खासगी बँकांनी शेतकऱ्यांकडे कर्जाची हप्ते भरले नाही म्हणून नोटीसा पाठवल्या आहेत. महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, अर्थमंत्री, कृषीमंत्री यांचे या गोष्टीकडे लक्ष का जात नाही. संपूर्णपणे शेती व उद्ध्वस्त झालेली आहे आर्थिक कणा मोडून पडलेला आहे. असे असताना आता हप्ते कुठून फेडायचे असा प्रश्न शेतकरी राजाला पडलेला आहे. घरातील स्त्रीला स्वयंपाक करण्यासाठी, रोजची पोटाची खळगी भरण्यासाठी देखील अन्न -वस्त्र - निवारा राहिलेला नाही. मासिक पाळी आल्यानंतर सॅनिटरी नॅपकिनचा तुटवडादेखील मोठ्या प्रमाणात असल्याची तक्रार केली जात आहे. अनेक ठिकाणी शेताकडे जाण्यासाठी पूल वाहून गेल्याने दळणवळण यंत्रणा बंद पडली आहे. महाराष्ट्र राज्य विद्युत महामंडळाचे यांच्यापुढे वीज देण्यासाठी मोठे संकट देखील उभे राहिलेले आहे. कारण शेतातील अनेक ठिकाणी रस्त्यांवर, वाड्यावर, झाडाझुडपात पूल वाहून गेलेले आहेत. तारा तुटलेल्या आहेत. मोटार वाहून गेलेले आहेत. शेतीला पाणी कसे पुरवणार असा एक प्रश्न निर्माण झालेला आहे.

या सर्व प्रश्नांतून शेतकऱ्याने संपूर्ण कर्जमाफीची अपेक्षा केलेली आहे त्याकडे खरंच सरकार लक्ष देणार का हा देखील सवाल आता विचारला जात आहे. मोठ्या उद्योगपतींना कर्जमाफी दिली असताना त्यांचे कर्ज राईट ऑफ केल्या असताना शेतकऱ्यांना मात्र अशा प्रकारची मदत करताना नेहमी राज्यकर्त्यांच्या मनात प्रश्न निर्माण होतो. त्यावेळेस त्यांच्याकडे पैसे नसतात अशी उत्तर दिली जातात. करांकडे लक्ष देण्यासाठी, शेतकऱ्यांचे प्रश्न उपस्थित करण्यासाठी शेतकऱ्यांच्या प्रश्नावर आंदोलन करण्यासाठी राज्यकर्त्यांना वेळ नाही आणि इच्छाही नाही? त्यामुळे या अस्मानी आणि सुलतानी संकटात गरीब बिचारा शेतकरी पूर्णपणे कोलमडून गेलेला आहे.

## बदली झालेल्या शिक्षकांला आनेगावकरांनी दिला अश्रु नयनांनी निरोप

युसूफवडगांव । प्रतिनिधी


**केज तालुक्यातील आनेगाव येथील जि.प.शाळेतील बदली झालेल्या आपल्या आवडत्या शिक्षकांना विद्यार्थी व गावकरी यांनी दिला अश्रु नयनांनी निरोप.**

गेल्या २० वर्षापासून आनेगाव येथील जि.प.शाळेमध्ये शिक्षक म्हणुन कार्यरत असणारे श्री.जयराम मांगडे यांची नुकतीच येथील शाळेवरून दुसऱ्या शाळेवर बदली झाली होती.सरांचा शैक्षणिक क्षेत्रातील योगदानाबद्दल तर त्यांना आदर्श शिक्षक पुरस्कार मिळालाच आहे पण त्याच बरोबर त्यांनी गेल्या २० वर्षापासून शालेय विद्यार्थी घडवत असतांना त्यांनी याच बरोबर गावातील प्रत्येक सामाजिक कार्यात सुद्धा आपला सहभाग नोंदवुन आपले कर्तव्य पार पाडले आहे.गावकऱ्यांच्या सुख दुःखात काय धाऊन जाणारे शिक्षक म्हणुन त्यांची ख्याती आहे.त्यामुळे आपण केवळ शिक्षक म्हणुन न राहता आपण सुद्धा याच गावचे आहोत ही भावना मनात ठेवुन त्यांनी विद्यार्थी व गावकऱ्यांसाठी काम केले आणि म्हणुनच त्यांना त्यांचा निरोप समारंभ चांगल्या पद्धतीने झाला पाहिजे यासाठी सर्व गावकऱ्यांनी सहभाग नोंदवला.सरांनी शाळेसाठी केलेले काम व गावकऱ्यांचा शाळेमध्ये असणारा सहभाग यामुळे सर्व गावकरी बदली झाल्यामुळे भावुक झाले होते.या कार्यक्रमासाठी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून केंद्राचे केंद्रप्रमुख श्री.अर्जुन बोराडे सर प्रमुख अतिथी म्हणून श्रीमान बहिरवाळ सर उपस्थित होते.पवार सर उपस्थित होते. या कार्यक्रमांमध्ये मुलांनी मांगडे सरांविषयी मनोगत व्यक्त केले तसेच गावकऱ्यांनीही सरांविषयी मनोगत व्यक्त केले.सगळेच लोक भाऊक झाल्यामुळे कार्यक्रम सुरू असताना सगळ्यांच्या डोळ्यातून अश्रू वाहत होते.सगळ्यांना मांगडे सर म्हणजे आपल्या घरातील व्यक्ती आहे असे वाटत असल्याने सर्व गावकऱ्यांनी सरांना आदरपूर्वक निरोप दिला.शेवटी सर्व गावकऱ्यांनी सरांना हलकी वाजवत सर्व गावातून त्यांची मिरवणूक काढली.महिलांनी सरांचे औक्षण केले.ज्या पद्धतीने मुलीचे लग्न झाल्यावर मुलगी सासरी जाताना मुलीची पाठवणी केली जाते त्याच पद्धतीने मांगडे सरांना गावातून ह्रदय पुर्वक निरोप दिला सरांनी शाळेचा केलेला विकास आणि गावकऱ्याशी असलेली जवळीक या कार्यक्रमातून दिसुन आली.

# दसरा, गांधी जयंती आणि बीड जिल्ह्याची सद्यस्थिती:संघर्ष, परंपरा आणि आशेचा दीप

**बीड जिल्हा सध्या अतिवृष्टीच्या छायेत आहे . गेल्या काही दिवसांत झालेल्या मुसळधार पावसामुळे नद्या , नाले तुडुंब भरून वाहत आहेत ; अनेक शेतं पाण्याखाली गेली आहेत ; घरं, रस्ते, शिवार यांत पाणी साचले आहे . शेतकरी हवालदिल झाले आहे . पिके पाण्याखाली गेल्याने आर्थिक नुकसान झाले आहे . पावसाच्या धारा कितीही जोरात कोसळल्या तरी मनातील आशेचा दिवा विझू देऊ नका . आजही गावोगावी पाणी साचले आहे , गावांचा संपर्क तुटलेला आहे , रस्ते बंद झाले आहेत . प्रशासन , पोलीस दल , महसूल विभाग सतत कार्यरत आहे . ग्रामपंचायत अधिकारी , सहाय्यक कृषी अधिकारी , ग्राम महसूल अधिकारी यांच्यासह अधिकारी वर्ग मदतीसाठी दिवस-रात्र धावपळ करत आहे . मदतीसाठी नियंत्रण कक्ष सतत सुरू आहे.**

दसरा किंवा विजयादशमी हा हिंदू संस्कृतीतील एक अत्यंत महत्त्वाचा सण आहे . प्राचीन काळापासून हा सण चांगल्याचा वाईटावर विजय दर्शवतो . रामायणानुसार प्रभू श्रीरामांनी याच दिवशी रावणाचा वध करून सीतेची सुटका केली आणि अयोध्येला परतताना हा दिवस



विजयाचा उत्सव म्हणून साजरा करण्यात आला . महाभारतातील पांडवांनी अज्ञातवास संपल्यानंतर आपल्या शस्त्रांची पूजा करून पुन्हा युद्धात विजय मिळवण्यासाठी हा दिवस निवडला होता . त्यामुळे दसऱ्याला विजयादशमी असे नाव पडले . दसरा म्हणजे वाईट प्रवृत्तींचा पराभव आणि नवी सुरुवात करण्याचा दिवस . या दिवशी लोक रावण दहन करतात, सोन्याची पाने देवांना अर्पण करतात आणि एकमेकांना देतात, जे समृद्धी आणि ऐक्याचे प्रतीक आहे . रावण फुंकला की वाईट जळून खाक झाले, आता अंतःकरणातील भीती, राग, लोभ यांना ही जाळून टाका. २ ऑक्टोबर हा दिवस महात्मा गांधींचा जन्मदिन आहे . राष्ट्रपिता म्हणून ओळखले जाणारे मोहनदास करमचंद गांधी हे सत्य, अहिंसा आणि त्यागाचे मूर्तिमंत उदाहरण होते . त्यांचे विचार आजही आपल्याला मार्गदर्शन करतात . गांधीजींनी दिलेली शिकवण सत्य : जीवनात सत्याला सर्वोच्च स्थान द्या, अहिंसा : हिंसेऐवजी शांततेने संघर्ष करा, स्वावलंबन : खादी, स्वदेशी आणि आत्मनिर्भरतेचा मार्ग निवडा, सहिष्णुता : सर्व धर्म, जात, समाज यांना समानतेने पाहा . आजच्या परिस्थितीत गांधीजींच्या शिकवणीचा खरा अर्थ आपल्याला जाणवतो . पूरस्थितीत एकमेकांना सहकार्य करणे, खोट्या अफवांवर विश्वास न ठेवणे, संयम राखणे हेच त्यांचे तत्त्वज्ञान होते . "तुम्ही जगात पाहू इच्छिता तो बदल स्वतः घडवा !" हा गांधीजींचा मंत्र आज अधिक महत्त्वाचा ठरतो . बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांची अवस्था गंभीर आहे . घरात पाणी , शेतात पाणी , जनावरांसाठी चाराचा प्रश्न , अन्नधान्याची टंचाई अशा वेदनादायक परिस्थितीतही बीडकर खंबीरपणे उभे आहेत . तहसीलदार शेळके यांनी भावनिक आवाहन केले : "तरुण मित्रांनी पुढे यावे ; आपले हात मदतीसाठी पुढे करावेत . वृद्ध, निराधार, आजारी नागरिक यांना आधी मदत करावी . कोणत्याही परिस्थितीत जीवित हानी होणार नाही, याची काळजी सर्वांनी घ्यावी . आपण सर्व खंबीर आहात ; आपल्यातले बळ मला माहीत आहे . या संकटावर आपण एकत्रितपणे मात करू . प्रशासन तुमच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे . मदतीसाठी व संपर्कासाठी आपण नेहमी तयार आहोत . कधीही संपर्क साधा. दसरा फक्त रावण दहन करण्याचा सण नाही , तर मनातील निराशा , भीती आणि अशक्तपणा जाळून टाकण्याचा दिवस आहे . आज या संकटाच्या काळात आपण एकत्र येऊन गावोगावी एकतेची मशाल पेटवूया . उद्याची पहाट सोनेरी आहे, आजचे ढग काळे आहेत तरी आशेचा किरण उगवेलच . गावात स्वच्छतेचे काम सुरू करावे, शेतातील नुकसानग्रस्त पिकांचे पंचनामे तातडीने करून द्यावेत, पूर ओसरल्यानंतर पिण्याचे पाणी उकळून वापरावे, मुला-मुलींना सुरक्षित ठिकाणी ठेवावे, प्रशासनाच्या अधिकृत सूचनांचे पालन करावे . गांधीजींनी दिलेला स्वावलंबनाचा मंत्र आजही तितकाच उपयुक्त आहे . गावोगावी लोकांनी एकत्र येऊन परस्पर साहाय्य करावे , पूरग्रस्तांना अन्नधान्य , कपडे , औषधे यांची मदत द्यावी . सत्याग्रह हा केवळ संघर्ष नाही , तो स्वच्छ समाजासाठीची शपथ आहे . पावसाचा जोर ओसरलाच पाहिजे, पण आपल्या मनातील जिद्द वाढली पाहिजे . दसऱ्याचा रावण जळतोच , पण मनातील भीती, नैराश्य आणि वेदना देखील जळल्या पाहिजेत . गांधीजींच्या मार्गावर चालून आपण पुन्हा एक नवा दिवस घडवूया . सोनेरी भवितव्याची पहाट आपल्यासाठी उगवेल या विश्वासानेच दसरा आणि गांधी जयंती साजरी करूया . या दसऱ्याला खरेदी कमी करा पण आशेचा दिवा जास्त लावा . गांधी जयंतीच्या दिवशी स्वतःशी वचन द्या "मी माझ्या गावासाठी, माझ्या लोकांसाठी, माझ्या जिल्ह्यासाठी सदैव तयार राहीन !"

**चंद्रकांत सरस्वती प्रकाश शेळके, तहसीलदार , बीड**

## पान ६ वरून...

### दसरा मेळाव्यास मोठ्या

पी टी चव्हाण, अशोक शिंदे, बाबा पिसाळ, राजेश पवार, सचिन दाभाडे, बळीभाऊ कऱ्हे,साईनाथ सुरवसे, सुशील भोपळे, मच्छिंद्र यादव, कृष्णा ढाकणे, संतोष थोरात, प्रदीप उगलमुगले,रामचंद्र कोळेकर,विकास पवार, गणेश मुंडे,इब्राहिम शेख, गहिनीनाथ बारगजे,सत्यम पवार,केशव महानोर,कृष्णा बारगजे, सतीश ढाकणे, विलास शिंदे,बाबासाहेब जवरे, माऊली नागरगोजे,दत्ता गिरी,बाबासाहेब घोडके, प्रकाश काशीद,पप्पू खेडकर,निलेश सानप आदी भाजपा पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

--------------

### पाटोदा नगरपंचायतला

बुधवारी दिनांक ०१ ऑक्टोबर २०१५ रोजी सकाळपासून नगरपंचायतीच्या मुख्य प्रवेशद्वाराला कुलूप ठोकून सफाई कामगारांनी काम बंद आंदोलन छेडले. नियुक्तीपत्र मिळावे, सेवेत स्थैर्य मिळावे यासाठी कामगारांनी जोरदार घोषणाबाजी केली.आंदोलनाला सामाजिक कार्यकर्ते बाळासाहेब जावळे यांनी पाठिंबा दर्शवला. यावेळी त्यांनी सांगितले की, सफाई कामगार हे शहराच्या स्वच्छतेचे खरे शिल्पकार आहेत. त्यांना शासन निर्णयाप्रमाणे योग्य न्याय मिळालाच पाहिजे. नगरपंचायत प्रशासनाने कामगारांचे प्रश्न तातडीने सोडवले पाहिजेत, अन्यथा लढा आणखी तीव्र केला जाईल.या आंदोलनात नगरपंचायतीतील सर्वच सफाई कामगार सहभागी झाले होते. कामगारांच्या या आंदोलनामुळे नगरपंचायत प्रशासनावर तातडीने कारवाई करण्याची वेळ आली आहे.

--------------

### गेवराई परिसरात बिबट्या

त्याची खात्री करून घ्यावी, अशी मागणी होऊ लागली आहे. ज्या ठिकाणी हे प्राणी आढळून आले आहेत. त्या ठिकाणी त्यांच्या पायाचे ठसे छायाचित्रात स्पष्ट दिसत आहेत. एक बिबट्या मादी आणि तीन पिल्ले बराच वेळ त्या परीसरात फिरताना पाहिले असून, ती बिबट्या मादीच होती.असा दावा शेतकर्यांनी केला आहे.

--------------

### दसऱ्या मेळाव्यास लाखोंच्या

तरी वडवणी तालुक्यातील जास्तीत जास्त समाज बांधवांनी उपस्थित रहावे असे आव्हान भारतीय जनता युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष संजय भाऊ आंधळे यांनी केले आहे. राष्ट्रसंत भगवान बाबा यांच्या समाधीचे दर्शन घेण्यासाठी व नामदार पंकजाताई मुंडे यांचे विचार ऐकण्यासाठी दरवर्षीभगवान भक्ती गड येथे होणाऱ्या दसरा मेळाव्यास पूर्ण महाराष्ट्रातून लाखो समाज बांधव येतात , यावर्षीही ओला दुष्काळ सदृश्य परिस्थिती असतानाही नामदार ताईंचे विचार ऐकण्यासाठी गावागावातून मोठ्या संख्येने समाज बांधव येणार आहे. समाजामध्ये जनजागरी करत गत आठ दिवसापासून भारतीय जनता युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष संजय आंधळे यांनी गावागावात कॉर्नर बैठका घेऊन जनतेला भगवान भक्ती गडावर येण्याची आव्हान केले असून उद्या वडवणी भगवान भक्ती गड हा रस्ता ज्या मा असणार अशी आश्वासन समाज बांधवांनी दिले आहे.

--------------

### पूरग्रस्त राजापूर करांना

तसेच पूरग्रस्त भागात पिण्याच्या पाण्याची आवश्यकता आहे याची जाणीव मनात ठेवत आपल्या माणुसकीच्या दृष्टीने गोदाकाठी असलेल्या मिरगाव चे भूमिपुत्र तलवाडा येथील मातोश्री क्लिनिक चे डॉ.राम धुमक हे मदतीसाठी धावून गेले असून राजापूर येथे पिण्याच्या पाण्याचे शंभर बॉक्स नागरिकांना वाटप केले आहे.त्यांच्या या कार्याचे सर्व स्तरातून कौतुक करण्यात येत आहे यावेळी राजापूर गावचे सरपंच भास्कर गवते, बाळू गवते,सर्जेराव शेळके यांच्यासह नागरिक उपस्थित होते.

--------------

### उमेदवाराने प्रशिक्षणातील

योगदान दिल्याबद्दल मान्यवरच्या हस्ते सर्वांचा यथोचित सत्कार करण्यात आला. प्रशिक्षनार्थी यांना शासकीय योजनेतून निवास, नाष्टा-भोजन,शैक्षणिक साहित्य, गणवेश किट मोफत शासनामार्फत देण्यात येतात.मुलांचे ग्राउंड तय्यारी पोलीस मुख्यालय च्या ग्राउंडवर निमित घेण्यात येते व थेरी तासिका आझाद हिंद सेमी इंग्लिश उर्दू शाळेत घेण्यात येतात. प्रशिक्षण संस्था व शिक्षकांनी उत्कृष्ट घेण्याचे ठरवलेले असून उमेदवाराचे मोफत पोलीस भरती फॉर्म शाळेत भरून घेण्यात येणार असून मागील सर्व बॅच च्या मुला-मुलींनी रज्जाक सर, फैसल सर यांच्याशी संपर्क साधून लाभ घ्यावा असे आवाहन शेख मुसा यांनी केले आहे.

-----

## पान १ वरून...

### शेतकरी कर्जाचा ओझ्याखाली तर

सोडले गेले आहेत. यावेळी त्यांनी एका ताज्या बातमीचा उल्लेख करून सरकारच्या धोरणांवरही टीका केली. ते म्हणाले, सरकारने शेतकऱ्यांवर पूरभार लादला आहे, ज्यामुळे काही साखर कारखान्यांच्या मालकांना, जे अलीकडेच भाजपमध्ये सामील झाले, त्यांच्या शेकडो कोटी रुपयांच्या कर्जावर सरकारी हमी मिळाली आहे. मात्र, सामान्य शेतकऱ्यांना कर्ज घेण्यासाठी जमीन गहाण टाकावी लागते, बैलजोडी विकावी लागते किंवा पत्नीचे मंगळसूत्रही गहाण ठेवावे लागते. ठाकरेंनी उपहासाने म्हटले, की साखर सम्राट भाजपमध्ये गेल्यावर त्यांच्या कर्जाची हमी सरकार घेत असेल, तर सध्या शेतकऱ्यांनीही भाजपमध्ये येऊन कर्ज माफ करण्याची वाट पाहायची का? यावरून सरकारच्या दुहेरी भूमिकेवर प्रश्न उपस्थित केले. एकंदरीत, ठाकरेंनी शेतकऱ्यांच्या दुर्दशेवर प्रकाश टाकत सरकारला जागे करण्याचा प्रयत्न केला आहे. ते म्हणाले, संकटाच्या काळात राजकारण न करता सर्वांनी एकजुटीने शेतकऱ्यांच्या पाठीशी उभे राहिले पाहिजे, जेणेकरून त्यांना न्याय मिळेल आणि ते पुन्हा उभे राहू शकतील.

----------

### शेतकऱ्यांना हेक्टरी ५० हजाराची

सांगितले. तसेच आपत्ती व्यवस्थापनाकडून संरक्षण भिंत बांधून देण्याची निर्देश दिले. बीड तालुक्यातील हिंगणी खुर्द या गावात जाऊन नुकसानीची पाहणी केली व नागरिकांशी संवाद साधला. यावेळी स्थानिक नागरिकांनी आपल्या व्यथा मांडल्या व शासनाच्या माध्यमातून तात्काळ मदत मिळवून देण्याची मागणी केली. बीड जिल्ह्यात अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले आहे. जमिनीवरील माती वाहून गेली, घरात पाणी शिरून संसार उध्वस्त झाला, पिके नष्ट झाली असे न भूतो न भविष्यति संकट शेतकऱ्यांवर ओढवले आहे. या कठीण प्रसंगी शेतकरी बांधवांसोबत ठाम उभे राहत, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे (शरदचंद्र पवार) प्रदेश सरचिटणीस तथा कर्जत-जामखेडचे आमदार रोहित पवार यांनी बीड जिल्हाधिकारी यांची भेट घेऊन शासनाने तातडीने व भरीव मदत द्यावी तसेच नागरिकांच्या पुनर्वसनाची गरज असून नागरिकांना शासनाच्या माध्यमात तात्काळ सुरक्षित ठिकाणी ठेवण्याची मागणी केली. बीड मतदारसंघातील चौसाळा ते पिंपळगाव घाट गावाला जोडणाऱ्या रस्त्यावर अतिवृष्टीच्या काळात पुलावरून प्रवास करत असताना श्री. स्वप्निल विक्रम शिंदे हे दुर्दैवाने पुराच्या प्रवाहात वाहून गेले. अद्याप त्यांचा शोध सुरूच आहे. आ.रोहित पवार यांच्यासमवेत आ.संदीप क्षीरसागर यांनी त्यांच्या कुटुंबीयांची भेट घेतली. यावेळी प्रशासनाला शोध मोहिमेला गती द्यावी अशी विनंती रोहित पवार यांनी केली.

------------------

### जिल्हापरिषद आणि पंचायत

प्रारुप मतदार यादीची ८ ऑक्टोबरला प्रसिद्ध होणार राज्यातील २४७ नगरपरिषदा व ४२ नगरपंचायतींच्या सदस्य पदाच्या व थेट अध्यक्षपदाच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठीची प्रभागनिहाय प्रारूप मतदार यादी ८ ऑक्टोबर २०२४ रोजी प्रसिद्ध करण्यात येणार आहे. त्यावर १३ ऑक्टोबर २०२५ पर्यंत हरकती व सूचना दाखल करता येतील. राज्य निवडणूक आयोगाने १ जुलै २०२५ हा अधिसूचित दिनांक निश्चित केला असून त्या दिवशी अस्तित्वात असलेली विधानसभेची मतदार यादी या निवडणुकांसाठी वापरण्यात येणार आहे.

--------------

### सरकारी कर्मचारी आणि पेन्शनधारकांना

चिंता व्यक्त केली होती. ७ व्या वेतन आयोगांतर्गत ज्या कर्मचाऱ्यांचे किमान मूळ वेतन १८,००० रुपये आहे, त्यांच्या मासिक कमाईत ५४० रुपयांची वाढ होईल. यामुळे त्यांचे एकूण वेतन २८,४४० रुपयांपर्यंत पोहोचेल. तर किमान ९,००० रुपये पेन्शन असलेल्या सेवानिवृत्तांसाठी ही वाढ २७० रुपये असेल. आता या निर्णयामुळे केंद्रीय कर्मचाऱ्यांच्या दिवाळीच्या उत्साहात आणखी भर पडणार आहे.

---------

### अजित पवार -शरद पवार

माहिती आहे.शरद पवार हे माळेगावचं शिवनगर विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष आहेत. तिथल्या सभासदांनी मागेच त्यांना अध्यक्ष केलं आहे. तिथे जी बॉडी आहे, माळेगाव सहकारी साखर कारखान्याचा चेअरमन हा त्या बॉडीवर व्हाईस चेअरमन म्हणून येतो. अशी त्याची घटना आहे. त्यामुळे ते इलेक्शन झाल्यानंतर त्याबद्दलची जी बैठक होती त्यासाठी मी आलो होतो. ती बैठक झाली. विश्वस्त मंडळ नेमायचं असतं. तो अधिकार अध्यक्षांनाच असतो. आमचे सहा गट आहेत. त्यातील प्रत्येकी एक प्रतिनिधी घ्यायचा असतो", अशी प्रतिक्रिया अजित पवार यांनी शरद पवारांच्या भेटीनंतर दिली.

------------

### डॉ. तेलतुंबडेंच्या परदेश

केली की, तेलतुंबडे केवळ व्याख्याने देणार नाहीत तर विविध विद्यापीठांमध्ये सेमिनार (परिसंवाद) सहभागी होणार आहेत. याचा विचार व्हावा. याला राष्ट्रीय तपास संस्थेचे (एनआयए) विशेष वकील चिंतन शाह यांनी आक्षेप नोंदवला. ते म्हणाले की, तेलतुंबडे पळून जाण्याची शक्यता असल्याने त्यांना परदेश प्रवासाची परवानगी देऊ नये, अशी मागणी त्यांनी केली. न्यायमूर्ती गडकरी यांनी तेलतुंबडेंचे वकील देसाई यांना सांगितले, "आताची परिस्थिती अशी आहे की विशेष एनआयए न्यायालयाने तुमचा दोषमुक्ती अर्ज फेटाळला आहे. एकतर व्हर्च्युअल व्याख्याने द्या किंवा जाऊ नका."

-----------

### श्री क्षेत्र भगवानगड ट्रस्टला वन विभागाची ४

ही जमीन हस्तांतरित होण्यासाठी मागणी केली होती. विजयादशमी म्हणजेच भगवान गडाचा स्थापना दिवस, आज विजयादशमीच्या पूर्व संध्येला हा निर्णय घोषित झाल्याने गडाच्या भक्तांमध्ये आनंदाचे वातावरण असून, या निर्णयासाठी धनंजय मुंडे यांनी देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय पर्यावरण व वन मंत्री भूपेंद्र यादव, त्याचबरोबर राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा गडाच्या सर्व भक्तांच्या वतीने आभार मानले आहेत.

--------------

### विदर्भात पावसाचा जोर

अंदाज देण्यात आला. मराठवाड्यातही काही ठिकाणी जोरदार पावसाची शक्यता आहे. मध्य महाराष्ट्रातील पुणे, सातारा, सांगली, सोलापूर, अहिल्यानगर आणि नाशिक जिल्ह्यातही काही ठिकाणी पावसाची शक्यता आहे. तर कोकणात पुढील ५ दिवस पावसाची उघडीप राहण्याची शक्यता आहे.

--------

### दसऱ्याला 'झेंडू'

आहे. मात्र पुरवठा कमी असल्याने झेंडूच्या फुलांचे दर वाढले आहेत. गणेशोत्सवात ८० ते १०० रुपये किलोने विकली जाणारी झेंडूची फुले नवरात्रोत्सव सुरू झाल्यापासून १०० ते १२० रुपये दर होते.सोमवारपासून दर वाढत १६० ते २०० रुपयांवर गेले असल्याचे फूलविक्रेत्या शीतल भोसले-पिसाळ यांनी सांगितले. अतिवृष्टीने सर्व फुलझाडे खराब झाली असून ऐन सणात फुले खराब झाल्याने शेतकरी हताश असल्याचे विक्रेत्यांचे म्हणणे आहे.झेंडूचे पीक थंड हवामानात चांगले येते. मागील २० ते २५ दिवसांत जास्त पावसामुळे किंवा प्रतिकूल हवामानामुळे पिकाच्या वाढीवर परिणाम झाल्याने उत्पादन कमी झाले आहे. ज्यामुळे फुलांच्या किमती वाढल्या असल्याचे चित्र बाजारात दिसत आहे आज मोठ्या प्रमाणात झेंडू विक्रीला आला आता आणखी शेतकरी व्यापारी झेंडू घेऊन आले तर त्याचा भावदेखील पडण्याची शक्यता नाकारता येत नाही .

-------------

### आधार अपटेडसाठी आता

यासाठी नागरिकांना १२५ रुपये शुल्क भरावे लागेल. ७ ते १७ वर्षे वयोगटातील मुलांच्या बायोमेट्रिक अपडेटसाठीही १२५ रुपये शुल्क आकारले जाईल. ३० सप्टेंबरपर्यंत हे अपडेट मोफत होते. आधार कार्डमधील डेमोग्राफिक अपडेट्स (उदा. नाव, लिंग, जन्मतारीख, पत्ता, मोबाईल नंबर किंवा ईमेल अ‍ॅड्रेस अपडेट करणे) यासाठी ७५ रुपये शुल्क आकारले जाईल. मात्र, हे अपडेट बायोमेट्रिक अपडेटसोबत केले तर ते मोफत असेल. तुम्ही हे अपडेट ऑनलाईन केले, तर ते विनामूल्य असेल, परंतु आधार केंद्रावर यासाठी तुम्हाला ७५ रुपये शुल्क द्यावे लागणार आहे.

----------

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

गुरुवार दि. ०२ ऑक्टोबर २०२५ | ३


## थोडक्यात...



### राजमाता जिजाऊ महाविद्यालयांमध्ये सेवा पंधरवडा निमित्ताने स्वच्छता मोहीम

किल्ले धारूर । प्रतिनिधी

येथील मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित राजमाता जिजाऊ महाविद्यालयांमध्ये राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने सेवा पंधरवडा निमित्ताने महाविद्यालय परिसरामध्ये स्वच्छता मोहीम आयोजित करण्यात आली. याप्रसंगी राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी महाविद्यालय परिसर स्वच्छ केला. तसेच कचऱ्याचे विघटन व घनकचरा यांचे व्यवस्थापन कसे करायचे याविषयी प्रोफेसर डॉ. अशोक लाखे यांनी राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांना मार्गदर्शन केले. याप्रसंगी उपप्राचार्य प्रा. महादेव जोग, उपप्राचार्य मेजर डॉ. मिलिंद गायकवाड, पर्यवेक्षक प्रा. सच्चिदानंद ढेपे, कार्यालय अधीक्षक श्री. सुभाष वायाळ, आयक्यूएसी समन्वयक डॉ. एल. बी. जाधवर यांची उपस्थिती होती. सेवा पंधरवडा निमित्ताने आयोजित स्वच्छता मोहिमेसाठी स्वयंसेवकांना कार्यक्रमाधिकारी डॉ. डी. बी. जाधव, डॉ. विजयकुमार कुंभारे, प्रा. बालासाहेब जोगदंड यांनी मार्गदर्शन केले. याप्रसंगी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक व विद्यार्थ्यांची उपस्थिती मोठ्या संख्येने होती.

### हाजी हकीम तांबोळी यांचे निधन

आष्टी । प्रतिनिधी



येथील सेवानिवृत शिक्षक हाजी अब्दुल हकीम मोहम्मद तांबोळी यांचे रविवार दि. २९ सप्टेंबर रोजी आष्टी येथील राहत्या घरी वृद्धापकाळाने निधन झाले. मृत्यूसमयी त्यांचे वय ९० वर्ष होते. त्यांचा दफनविधी शहरातील शेकापूर रोडवरील काली मस्जिद कब्रस्तान येथे रात्री १० वाजता शोकाकुल वातावरणात करण्यात आला. १९९७ मध्ये सेवानिवृत्त झाल्यानंतर त्यांनी पवित्र हजयात्रा पूर्ण केली. शहर आणि आसपासच्या गावचे लोक त्यांना गुरुजी म्हणून ओळखायचे . हकीम तांबोळी यांनी इस्लाम धर्मातील कलमा, नमाज, रोजा, हज आणि जकात या पाच मूल्यांवर जीवन जगण्याचा पूर्णपणे प्रयत्न केला. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, दोन मुली, जावई, नातवंडे असा मोठा परिवार आहे.



### पूरग्रस्तांच्या मदतीला राष्ट्रीय स्वयंसेवक संघ व सेवाभारतीचा हातभार – संसार उपयोगी साहित्याचे वाटप

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा परिसरात झालेल्या अतिवृष्टी व पूरस्थितीमुळे शेकडो कुटुंबांचे संसार उद्ध्वस्त झाले आहेत. अनेकांच्या घरातील साहित्य वाहून गेले, जगण्याची साधनं नष्ट झाली. अशा कठीण प्रसंगी राष्ट्रीय स्वयंसेवक संघ पाटोदा व सेवाभरती संघटनांनी पुढाकार घेत पूरग्रस्त कुटुंबांना संसार उपयोगी साहित्याचे वाटप करून त्यांना दिलासा दिला.या मदत कार्यांतर्गत पूरग्रस्त कुटुंबांनी भांडीकुंडी यासह दैनंदिन जीवनासाठी आवश्यक असलेले साहित्य देण्यात आले. स्वयंसेवकांनी घराघरात पोहोचून हे साहित्य वाटप केले. पूरामुळे हवालदिल झालेल्या कुटुंबांच्या चेहऱ्यावर या मदतकार्यामुळे समाधान व दिलासा दिसून आला. संकटसमयी समाजासाठी योगदान देणे हीच खरी सेवा या भावनेतून संघ व सेवाभरती कार्यकर्ते मदत कार्यात सहभागी झाले. गावकऱ्यांनी त्यांच्या या पुढाकाराचे मनापासून स्वागत करत कौतुक व्यक्त केले.समाजासाठी अखंड सेवा हाच आमचा संकल्प आहे. पूरग्रस्तांसोबत सदैव उभे राहून त्यांना आवश्यक मदत पुरवली जाईल, असे संघ व सेवाभरतीच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले.

### पाटोदा एसटी स्टँडवर चोरांचा सुळसुळाट

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा एसटी स्टँड येथे मंगळवार दि ३० रोजी चार वाजता पाटोदा येथील एसटी स्टँड वर एक अंगणवाडी सेविका मेटींगच्या निमित्त पाटोदा येथे आली होती एसटी बस मध्ये दोन चोर महिला त्याचा पाठलाग करत एसटी बस मध्ये चढत असताना त्यांच्या जवळील पर्स चोरीला पिडीत महिलेच्या लक्षात येताच चोर महिलेला त्या पिडीत महिलेने धरलं परंतु दुसऱ्या महिला जवळ देवून त्याला फरार केले होते. पिडीत महिला त्या चोर महिलेला पोलीस येवूस्तर सोडले नाही नंतर पोलीस एसटी स्टँड वर येवून चोर महिलेस ताब्यात घेऊन कारवाई केली.

# धनंजय मुंडेंच्या माध्यमातून पाच ग्रामपंचायत बांधकामास १ कोटी पंधरा लाखांचा निधी मंजूर



परळी वैद्यनाथ । प्रतिनिधी

**परळीचे आमदार तथा माजी मंत्री धनंजय मुंडे यांच्या माध्यमातून परळी वैद्यनाथ विधानसभा मतदारसंघातील आणखी ५ ग्रामपंचायतींचे रुपडे पालटणार असून, स्वतःची ग्रामपंचायत इमारत नसलेल्या ५ ग्रामपंचायतींच्या ग्रामपंचायत बांधकामास राज्य सरकारच्या वतीने एकूण १ कोटी १५ लाख रुपये निधी ग्रामविकास विभागाच्या वतीने मंजूर करण्यात आले आहेत.**

धनंजय मुंडे यांच्या निर्देशानुसार मतदारसंघातील स्वतःची इमारत नसलेल्या ग्रामपंचायत इमारत बांधकामासाठी निधी मागणी प्रस्तावित करण्यात आली होती. त्यानुसार ग्रामविकास विभागाने परळी तालुक्यातील मरळवाडी (२० लाख), लाडझरी (२५ लाख), रेवली (२५ लाख), तसेच अंबाजोगाई तालुक्यातील धानोरा बुद्रुक (२५ लाख) व निरपणा (२० लाख) याप्रमाणे निधी मंजूर केला असून, याबाबतचा शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे.दरम्यान याआधी काही दिवसांपूर्वी आणखी ४ ग्रामपंचायत इमारतीस देखील याच योजनेतून निधी मंजूर करण्यात आलेला आहे. धनंजय मुंडे यांनी राज्य सरकार सह ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांचे आभार व्यक्त केले आहेत.

## ओला दुष्काळ जाहीर करा व एकरी पन्नास हजार अनुदान द्या; लाल बावटा बांधकाम कामगार संघटनेची मागणी

वडवणी । प्रतिनिधी

गेल्या दोन महिन्यांपासून संपूर्ण महाराष्ट्रात अतिवृष्टीमुळे लाखो हेक्टर शेतजमिनीवरील पिकांचे अतोनात नुकसान झाले आहे... वडवणी तालुक्यातसुद्धा सततच्या पावसाने सोयाबीन, कापूस, तूर व फळबागांचे प्रचंड नुकसान झाले आहे. तसेच शेतमजुरांचा सुद्धा रोजगार बुडाला आहे. या भीषण परिस्थितीत सरकारने जबाबदारी घेऊन मदत करावी. कारण या अतिवृष्टी व ढगफुटीने शेतकऱ्यांच , शेतमजूरांच , कामगारांच मोठ नुकसान झालेलं आहे शेती पुरपणे पुराच्या पाण्यान वाहुन गेली.काही ठिकाणी मातीसह खरडुन गेली.व शेतात पाणी साचल्याने पीक नुकसान झाली आहे .या मुळे शेतकऱ्यांच उत्पादन शुन्य होणार आहे. आता पर्यंत केलेला खर्च हा पुर्णपणे बुडाला .व शेती



आता कसण्या योग्य करण्यासाठी खूप मोठा खर्च शेतकऱ्यांना येणार आहे .तरी सरकारने भरघोस कशी मदत करावी म्हणजे एकरी ५०,००० रु . द्यावे .शेतकऱ्यांना उत्पादन शुन्य झाल्याने शेतमजूरांना कोणी मजूर म्हणून कामावर बोलवणार नाही त्यांना मंजुरी मिळणार नाही. पर्याने उपासमारीची वेळ हि शेतमजूरांवर येणार आहे. तसेच गाव खेड्यातील बांधकाम कामगार व इतर कामगारांच्या व्यवसायला मोठा फटका बसणार आहे.शेतकर्यांकडे पैसे नसल्या कारणाने कोणी नविन बांधकाम काम चालू करणार नाही. मिस्त्री,बिगारी कामगार यांना सुद्धा या महापुरांची झळ बसणार आहे. त्यामुळे एकंदरीतच सरकारने गांभीर्याने या विषयाकडे लक्ष द्यावे व मराठवाड्यातील वडवणी तालुक्यातील ग्रामीण अर्थव्यवस्था सुव्यवस्थित आणण्यासाठी खालील मागण्याची अंमलबजावणी करावी.

## गर्भाशयाच्या कर्करोग प्रतिबंधक लसीसाठी महत्त्वपूर्ण भागीदारी

बीड । प्रतिनिधी

प्रतिबंधात्मक आणि डिजिटल प्रणालीला महत्त्व देणाऱ्या आरोग्यसेवेच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल टाकत, भारतातील दुसऱ्या क्रमांकाची टीपीए सेवा पुरवठादार असलेल्या 'विदाल हेल्थ'ने आणि जगातील सर्वात मोठी लस उत्पादक संस्था असलेल्या सिरम इन्स्टिट्यूट ऑफ इंडिया (एसआयआय) प्रा. लि. ने, गर्भाशयाच्या मुखाच्या कर्करोगाविषयी जनजागृती आणि प्रतिबंधासाठी एक धोरणात्मक भागीदारी जाहीर केली आहे.

दि. १ ऑक्टोबर २०२५ पासून, 'विदाल हेल्थ'चा डिजिटल प्लॅटफॉर्म हा पहिल्यांदाच एचपीव्ही लसीसाठी सर्वकष (एंड-टू-एंड), कागदपत्रविरहित, सोयीस्कर आणि कॅशलेस अनुभव देणारा असेल. यावर डॉक्टरची वेळ ठरवण्यापासून, संमतीपत्र भरणे आणि प्रमाणपत्र मिळवण्यापर्यंत सगळी प्रक्रिया डिजिटल स्वरूपात असतील. हा संपूर्णपणे व्यवस्थापित आरोग्य कार्यक्रम औषधांच्या डोसच्या वेळेची आठवण, उपचारांचे पालन आणि नेटवर्क व्यवस्थापन यांमध्ये मदत करणार आहे. त्यातून सातत्यपूर्ण देखभाल करणे रुग्णांना शक्य होईल. विदाल हेल्थ ही बजाज फिनसर्व्ह हेल्थची १०० टक्के मालकीची उपकंपनी आहे. बजाज फिनसर्व्ह हेल्थ हा एक डिजिटल प्लॅटफॉर्म असून आरोग्यसेवा क्षेत्रातील विखुरलेल्या प्रणालींना तो एकत्र आणतो आणि प्रतिबंधात्मक आरोग्यसेवा, ओपीडी सेवा, टेलीमेडिसिन आणि प्रीपेड आरोग्यसेवा प्रदान करतो.

## आदिश्री महिला ग्रुपतर्फे नवरात्र उत्सव साजरा

चौसाळा । प्रतिनिधी

चौसाळा येथील आदिश्री महिला ग्रुप तर्फे दरवर्षीप्रमाणे यंदा देखील नवरात्र उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या ऐतिहासिक सोहळ्यात दांडिया सह मंगलागौर, सुगरण, लाझियम, होम मिनिस्टर, पैठणी स्पर्धा आदी विविध पारंपरिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.




या स्पर्धांमध्ये विजयी व सहभागी महिलांना आदिशक्ति ग्रुपच्या अध्यक्षा डॉ. भारती हावळे यांच्या हस्ते भेटवस्तू व पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. महिलांच्या या सन्मान सोहळ्यामुळे कार्यक्रमाला एक वेगळेच तेज प्राप्त झाले. या उत्सवात डॉ. भारती हावळे यांच्यासह ज्योत नाईकवाडे, मोनिका हावळे, मंगल लोढा, दीपा निनाळे, शिवकन्या नवसेकर, रोहिणी नाईकवाडे, सुनीता नाईकवाडे, आरती चौधरे, जयश्री गवळी, नंदा आवताडे तसेच अनेक महिलांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.आदिशक्ति महिला ग्रुपच्या वतीने साजऱ्या झालेल्या या नवरात्र महोत्सवाने गावातील महिलांच्या उत्साह, परंपरा आणि ऐक्याचा अनोखा ठसा उमटवला.

## पंच परिवर्तनातून भारत विश्व गुरू होऊ शकतो-गोरक्षनाथ आबुज

वडवणी । प्रतिनिधी

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने मागील शंभर वर्षांच्या कालावधीत समाजातील विविध क्षेत्रात केलेले योगदान लक्षणीय असून आज त्याचे फळ देशभर दिसून येत आहे.पंच परिवर्तनातून विश्व गुरू भारत होऊ शकतो.

असे प्रतिपादन गोरक्षनाथ आबुज यांनी केले. संघाच्या शताब्दी वर्षानिमित्त वडवणीत आयोजित संचलनावेळी प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते.

शहरातील प्रमुख रस्त्यांवरून निघालेल्या या शिस्तबद्ध संचलनात स्वयंसेवकांनी पूर्ण गणवेश परिधान करून उत्साहाने सहभाग घेतला. 'भारत माता की जय', 'वंदे मातरम'च्या घोषणांनी



संपूर्ण वडवणी शहर दुमदुमून गेले.नागरिकांनी ठिकठिकाणी पुष्पवृष्टी करत संचलनाचे स्वागत केले. पुढे बोलताना गोरक्षनाथ आबुज म्हणाले की,संघाने कुटुंब प्रबोधन,नागरिकी कर्तव्य, सामाजिक समरसता, स्वबोध,पर्यावरण या क्षेत्रांमध्ये आमूलाग्र सुधारणा करणे आवश्यक आहे.या बदलांमुळे केवळ देशाची आर्थिक उन्नती होणार नाही, तर सामाजिक आणि सांस्कृतिक क्षेत्रातही भारताला अग्रगण्य स्थान मिळू शकते.अशा अनेक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केले आहेत. स्वयंसेवकांची शिस्त, राष्ट्रभक्ती आणि त्यागभावनेमुळे समाजात एकात्मतेचे वातावरण निर्माण झाले आहे.

## आ.सुरेश धस यांच्या प्रयत्नामुळे १५१८ रुग्णांची नेत्र तपासणी

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील अनिषा ग्लोबल इंग्लिश स्कूल, जामगाव रोड येथे नमो नेत्र संजीवनी स्वास्थ्य अभियान अंतर्गत मोफत नेत्र विकार निदान, उपचार व शस्त्रक्रिया भव्य शिबिराचे आ.सुरेश धस यांच्या आयोजनात तर लातूरचे धर्मादाय सहआयुक्त राजेशजी सासने यांच्या हस्ते तर बीडचे धर्मादाय उप आयुक्त प्रदीप चौधरी यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला.

शिबिरामध्ये नेत्र तपासणी,चष्म्याचा नंबर तपासणी तसेच मोतीबिंदू तपासणी यासह महत्त्वपूर्ण वैद्यकीय तपासण्या पार पडल्या. रुग्णांना मोफत चष्मे वाटप करण्यात आले आणि मोतीबिंदू शस्त्रक्रियेसाठी आवश्यक मार्गदर्शन व सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या. या भव्य नेत्र तपासणी



शिबिरात १५१८ रुग्णांनी लाभ घेतला असून आनंदऋषिजी नेत्रालय, अहिल्यानगर येथील तज्ज्ञ डॉक्टरांनी संपूर्ण तपासणी शिबिरात आपले अमूल्य सहकार्य केले.

यावेळी बोलताना आ.धस म्हणाले,आपले यशस्वी पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांनी ''नमो नेत्र संजीवनी स्वास्थ्य अभियान'' ही योजना राबवून ग्रामीण व सर्वसामान्य रुग्णांच्या जीवनात खऱ्या अर्थाने उजेड निर्माण करण्याचे कार्य केले आहे. केंद्र सरकारच्या या उपक्रमाचा थेट लाभ आज हजारो रुग्णांना मोफत उपचार व शस्त्रक्रियेद्वारे होत असल्याचे प्रत्यक्ष अनुभवता आले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस गरीब रुग्णांप्रति संवेदनशील आहेत,ते जमेल तसे मदत करतात. प्रधानमंत्री योजनेतून रुग्णांसाठी ३ ते ५ लाख रुपयांची मदत मिळते त्या योजना गरजू लोकांपर्यंत पोहचवण्याचं काम करू. काही जबाबदाऱ्या समाजाला देखिल घ्याव्या लागतात सगळ सरकार अवलंबून राहत येत नाही.

श्री.मच्छिंद्र देवस्थानच्या वतीने १३ हॉस्पिटल आणि ३३ कोव्हिड सेंटर उघडले. त्याचा माध्यमातून अनेक रुग्ण वाचवले. आष्टी,पाटोदा आणि शिरूर कासार तालुक्यातील नुकसानग्रस्त नागरिकांना मदत करण्यासाठी विविध संस्था, दुग्ध संघ,आष्टी नगरपंचायत पदाधिकारी यांनी मिळून ५० लाख रुपये निधी गोळा केला आहे आणि ज्या लोकांना शक्य आहे त्यांनी लोकवर्गणीतून मदत करावी असेही ते म्हणाले.


तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड
दूरध्वनी क्रमांक ०२४८३२७५०२६
E-Mail ID: tahsildarambad gmail.com"
जा. क्र.२०२५/सेतु/कावि-७०० दिनांक-२५/०९/२०२५

जाहिर प्रगटन

तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय

अर्जदार श्रीमान/श्रीमती जावेद इलियास तांबोळी रा. जामखेड ता.अंबड जि. जालना यांनी यांच्या स्वत: जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहे त्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | जावेद इलियास तांबोळी | स्वत: | ०५/०५/१९७९ |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबंधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- २५/०९/२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरीत**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**



तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड
दूरध्वनी क्रमांक ०२४८३२७५०२६
E-Mail ID: tahsildarambad gmail.com"
जा. क्र.२०२५/सेतु/कावि-७०२ दिनांक-२६/०९/२०२५

जाहिर प्रगटन

तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय

अर्जदार श्रीमान/श्रीमती मुजमील इलियास तांबोळी रा. जामखेड ता.अंबड जि. जालना यांनी यांच्या स्वत: जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहे त्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | मुजमील इलियास तांबोळी | स्वत: | २७/०४/१९८७ |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबंधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- २६/०९/२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरीत**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**



तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड
दूरध्वनी क्रमांक ०२४८३२७५०२६
E-Mail ID: tahsildarambad gmail.com"
जा. क्र.२०२५/सेतु/कावि-६९३ दिनांक-२५/०९/२०२५

जाहिर प्रगटन

तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय

अर्जदार श्रीमान/श्रीमती रौशीन जुल्फेखार तांबोळी रा. जामखेड ता.अंबड जि. जालना यांनी यांच्या स्वत: जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहे त्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | रौशीन जुल्फेखार तांबोळी | स्वत: | २७/०१/१९९९ |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबंधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- २५/०९/२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरीत**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**



तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड
दूरध्वनी क्रमांक ०२४८३२७५०२६
E-Mail ID: tahsildarambad gmail.com"
जा. क्र.२०२५/सेतु/कावि-६९६ दिनांक-२४/०९/२०२५

जाहिर प्रगटन

तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय

अर्जदार श्रीमान/श्रीमती शारेश इलियास तांबोळी रा. जामखेड ता.अंबड जि. जालना यांनी यांच्या स्वत: जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहे त्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | शारेश इलियास तांबोळी | स्वत: | ०२/०४/२००२ |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबंधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- २४/०९/२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरीत**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**



तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड
दूरध्वनी क्रमांक ०२४८३२७५०२६
E-Mail ID: tahsildarambad gmail.com"
जा. क्र.२०२५/सेतु/कावि-७०१ दिनांक-२५/०९/२०२५

जाहिर प्रगटन

तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय

अर्जदार श्रीमान/श्रीमती जुनेद इलियास तांबोळी रा. जामखेड ता.अंबड जि. जालना यांनी यांच्या स्वत: जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहे त्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | जुनेद इलियास तांबोळी | स्वत: | ११/०५/१९७६ |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबंधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- २५/०९/२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरीत**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**



तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड
दूरध्वनी क्रमांक ०२४८३२७५०२६
E-Mail ID: tahsildarambad gmail.com"
जा. क्र.२०२५/सेतु/कावि-८११ दिनांक-२४/०९/२०२५

जाहिर प्रगटन

तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय

अर्जदार श्रीमान/श्रीमती मोहम्मद हुसेन भिकन बागवान रा. चिंचखेड ता.अंबड जि. जालना यांनी यांच्या स्वत: जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहे त्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | मोहम्मद हुसेन भिकन बागवान | स्वत: | १०/१०/१९५६ |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबंधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- २४/०९/२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरीत**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

# शेतकरी कर्जमाफी, ओला दुष्काळ जाहीर करा

## शेतकरी संघटनेच्या नेतृत्वात शेतकऱ्यांसह विभागीय आयुक्तालयात धडक

संभाजीनगर । प्रतिनिधी

ओला दुष्काळ जाहीर करा, शेतकऱ्यांना प्रति एकरी ५० हजार रुपये नुकसानभरपाई, शेतकरी कर्जमाफी, आत्महत्यांसह शेतमजुरांच्या विविध मागण्यांबाबत आक्रमक होत अक्षरशः बॅरिकेट बाजूला हटवत संभाजीनगर येथीज आयुक्तालयाच्या आवारात व त्यांनतर आयुक्तांच्या कार्यालयासमोरील व्हरांड्यात आक्रमक आंदोलन करण्यात आले. किसान सभा, शेतमजूर युनियन, सीटू कामगार संघटनेने शेतकऱ्यांसह विभागीय आयुक्तालयात धडक दिली.

या वेळी किसान सभेचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. अशोक ढवळे, केंद्रीय सहसचिव डॉ. अजित नवले, सीटू कामगार संघटनेचे डॉ. डी. एल. कराड, नत्थु साळवे, विजय गाभणे, मारुती खंदारे, ॲड. अजय बुरांडे, भगवान भोजने, रेहाना शेख, उद्धव पौळ आदींच्या नेतृत्वात शेतकऱ्यांसह आयुक्तालयात धडक दिली. प्रचंड घोषणांनी आयुक्तालयाचा परिसर दणाणून सोडला. या वेळी आपल्या मागण्यांविषयी आक्रमक भूमिका घेत मोर्चेकरांच्या शिष्टमंडळाने आयुक्तांशी चर्चा केली. या विषयी डॉ. नवले म्हणाले, की या चर्चेत प्रशासन मागण्यांविषयी सकारात्मक दिसले. शिवाय पंचनामे सदोष होत असल्याची बाब लक्षात आणून दिली असता कोणीही वंचित राहणार नाही, असे आयुक्त म्हणाले.मागण्यांबाबत प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यासह आठही पालकमंत्र्यांना याविषयी अवगत करण्याबाबतही आयुक्त सकारात्मक होते. मागण्यांची दखल न घेतल्यास तीव्र आंदोलन छेडण्यात येईल.

ओला दुष्काळ जाहीर करावा. शेतकऱ्यांना प्रति एकर ५० हजार रुपये नुकसानभरपाई द्या. रोजगार बुडालेल्या शेतमजुरांना, ग्रामीण व शहरी कामगारांना श्रमनुकसान भरपाई म्हणून प्रतिकुटुंब तातडीने ३० हजार रुपये महिना मदत द्या. शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफी द्या. पंतप्रधान पीकविमा योजनेत कॉर्पोरेट कंपन्याऐवजी शेतकऱ्यांना लाभ होईल, असे बदल करा. अतिवृष्टी, पुरामुळे रस्ते, पूल, बंधारे, तलाव, वीज वितरण कंपनीचे रोहित्र, विजेचे खांब वाहून गेले त्याची दुरुस्ती करा. ज्या शेतकऱ्यांची जमीन खरवडून गेली आहे त्या सर्व शेतकऱ्यांना जमीन बाजारभावाप्रमाणे मोबदला द्या. दगावलेल्या पशुधनाची भरपाई बाजार भावाप्रमाणे द्या. घराची, गोठ्याच्या नुकसानीची तत्काळ मदत द्या, अशा मागण्या यावेळी करण्यात आल्या.



# आता कृत्रिम रेतनाद्वारे शेळ्यांची गर्भधारणा; जाणून घ्या फायदे



ग्रामीण भागात शेळीपालन हा एक महत्वाचा शेतीपूरक व्यवसाय आहे. ग्रामीण भागातील अर्थशास्त्र सुद्धा बऱ्यापैकी या व्यवसायावर अवलंबून आहे. हा व्यवसाय जास्तीत जास्त फायदेशीर कसा करता येईल यासाठी प्रयत्न सुरु असतात. असाच एक शोध म्हणजे कृत्रिम रेतन. आतापर्यंत गायी आणि म्हशींमध्ये कृत्रिम गर्भधारणा याविषयी ऐकले आहे.

कृत्रिम रेतन एक असे तंत्र आहे ज्याद्वारे पशुपालक त्यांच्या गायी आणि म्हशींचा विकास दर, आरोग्य आणि उत्पादकता वाढवून त्यांचे उत्पन्न वाढवू शकतात. परंतु आता शेळ्यांमध्ये सुद्धा कृत्रिम गर्भधारणा करण्याचे प्रयोग केले जात आहे. काही ठिकाणी हे प्रयोग यशस्वी सुद्धा झाले आहेत. कृत्रिम रेतनाद्वारे शेळ्यांच्या जाती सुधारण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत.

कृत्रिम रेतन म्हणजे काय? कृत्रिम रेतन तंत्रज्ञान हे सहाय्यक पुनरुत्पादन तंत्रज्ञान आहे. पशुधनाची कार्यक्षमता आणि अनुवांशिक गुणवत्ता सुधारण्यासाठी ही एक उत्तम प्रजनन पद्धत आहे. याचा फायदा शेळीपालक यांना मोठ्या प्रमाणात होणार आहे. मथुरा येथे स्थित पंडित दीनदयाळ उपाध्याय कन्सेप्शन वेटरनरी सायन्सेस युनिव्हर्सिटी येथे गेल्या अनेक वर्षांपासून कृत्रिम रेतनचा अभ्यास सुरू आहे, ज्याद्वारे शेळ्यांच्या कळपाचे बीजारोपण करून करडांना जन्म देता येईल. त्याच वेळी. अशा परिस्थितीत सर्व शेळ्यांची एकत्र गर्भधारणा केल्यास त्यांची चांगली काळजी घेतली जाईल. शेळीच्या करड्यांचे मृत्युदर सुद्धा कमी होईल. जे शेळीपालनासाठी खूप उपयुक्त आहे.

शेळ्यांच्या कृत्रिम रेतनाचा काय फायदा होईल? : एक शेळी सुमारे १४ महिन्यांत ३५ ते ४० किलो वजनाची होते हे. पर्यावरण आणि योग्य आहाराअभावी त्यांचा वाढीचा दर कमी झाला आहे. त्यामुळे आता हा कालावधी वाढून १६ महिन्यांचा झालेला असल्याने पशुपालकांचे मोठे नुकसान होत आहे. अशा परिस्थितीत पशुपालकांनी वैज्ञानिकांच्या या एआय तंत्रज्ञानाचा अवलंब केल्यास शेळ्यांच्या मुलांच्या शारीरिक विकासात वाढ होऊन उत्पादनही चांगले होईल.

# पिकांसाठी सल्फर किती महत्वाचे आहे



राज्यातील शेतकरी शेती करताना आपल्या पिकांना विविध प्रकारची रासायनिक खते वापरत असतात. या सर्वांमध्ये युरिया हे खत सर्वात खपाचे खत म्हणून ओळखले जाते. अलीकडेच केंद्र सरकारने शेतीसाठी सल्फर कोटेड युरियाचा वापर करण्याचे धोरण अवलंबले आहे. मात्र आता पिकांसाठी सुलफर इतके महत्वाचे का आहे? सल्फरच्या कमतरतेमुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे नेमके काय नुकसान होऊ शकते? असे अनेक प्रश्न शेतकऱ्यांच्या मनात निर्माण होत असतात.


उत्पादनात ४० टक्क्यांपर्यंत घसरण :कृषी संशोधकांच्या एका अहवालानुसार, पिकांना किंवा झाडांना सल्फरची कमतरता जाणवल्यास त्यांची वाढ खुंटते तसेच उत्पादनात घट दिसून येते. सल्फरच्या कमतरतेमुळे तेलबिया पिकांच्या गुणवत्तेमध्ये आणि उत्पादनात ४० टक्क्यांपर्यंत घसरण होते. सल्फरची कमतरता शेती करताना मोठी समस्या असते. मात्र, शेतीमध्ये पिके घेताना शेतकऱ्यांच्या ही बाब लक्षात येत नाही.

तेलबिया पिकांसाठी महत्वाचे :भारतातील जवळपास ४१ टक्क्यांहून अधिक जमिनीत सल्फरची कमतरता आढळून येते. भारतीय तेलबिया पिकांमध्ये सोयाबीन, मोहरी, भुईमूग, तीळ हे प्रमुख तेलबिया पिके आहेत. या पिकांसाठी संतुलित खतांचा वापर आवश्यक आहे. या खतांमध्ये प्रामुख्याने नायट्रोजन, फॉस्फरस, पोटॅश, सल्फर, जस्त आणि बोरॉन ही खते आवश्यक असतात. यात तेलबिया पिकांच्या उत्पादनासाठी सल्फर हे खूप महत्वाचे खत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी तेलबिया पिके घेताना आपल्या जमिनीमध्ये सल्फरची कमतरता आढळून आल्यास त्याचा पिकांसाठी नक्की वापर करावा.

हरितलवकांच्या वाढीस मदत होते :सल्फर हा पिकांना हरितलवकांच्या चांगल्या वाढीस मदत करतो. सल्फर हे खत अमीनो ॲसिड, सिस्टीन, सिस्टिन आणि मेथिओनिन आणि प्रथिने संश्लेषणासाठी पिकांसाठी आवश्यक असते. मोहरी पिकाच्या विशिष्ट वासावर त्याचा परिणाम होतो. तेलबिया पिकांच्या पोषणामध्ये सल्फरचे विशेष महत्त्व असून, पिकांच्या वाढीच्या अवस्थेत पिकांच्या बिया टपोऱ्या होण्याच्या अवस्थेत अर्थात तेल तयार होण्याच्या प्रक्रियेत सल्फर हा घटक महत्त्वाची भूमिका बजावतो. त्यामुळे तेलबिया पिकांमध्ये तेलकट पदार्थाचे प्रमाण वाढण्यास मदत होते.

पिकांना सल्फर कधी द्यावे? पिकांचे थंडीपासून संरक्षण करण्यासाठी सल्फर फायदेशीर आहे. त्यामुळे सिंचनाच्या वेळी तेलबिया पिकांना ५ किलो प्रति बिघा या प्रमाणात सल्फर वापरावे. बेंटोनाइट सल्फरचा वापर फायदेशीर आहे. याशिवाय ८ ते १० किलो सल्फरची धूळ प्रति एकर फवारली जाऊ शकते किंवा ओले किंवा विरघळणारे सल्फरचे द्रावण तीन ग्रॅम प्रति लिटर या प्रमाणात फवारले जाऊ शकते. सुरवंटाचा प्रादुर्भाव आढळल्यास सल्फरची फवारणी करताना ब्युव्हेरिया बेसियाना ४०० मिली प्रति एकर २०० लिटर पाण्यात मिसळून वापरावे.

# ‘ब्लू जावा’ निळ्या रंगाच्या केळीचे दुर्मिळ वाण



महाराष्ट्रात शेतकरी प्रामुख्याने पिवळ्या रंगाच्या केळीच्या मोठ्या प्रमाणात उत्पादन घेतात. विशेष म्हणजे देशभरातील बाजारपेठांमध्ये आपली हीच केळी प्रसिद्ध आहेत. मात्र, अलीकडेच महाराष्ट्रातील सोलापूर जिल्ह्यात उजनी धरणाच्या काठावर एका शेतकऱ्याने ‘ब्लू जावा’ या निळ्या रंगाच्या विदेशी प्रजातीच्या केळीचे उत्पादन घेतले आहे. ज्यामुळे गेल्या काही दिवसांपासून सर्वीकडे या केळीची सर्वदूर चर्चा होताना दिसत आहे. विशेष म्हणजे या केळीबाबत अधिक जाणून घेण्याची इच्छा असलेला एक विशिष्ट शेतकरी वर्ग समाजमाध्यमांवर दिसून आला आहे.

‘ब्लू जावा’ केळी वाण हे दुर्मिळ वाण असून, त्याची लागवड अमेरिकेतील फ्लोरिडा प्रांतामध्ये मोठ्या प्रमाणात केली जाते. अमेरिकेतील ओगिल्वी प्रांतातील फॉर्मर ग्लोबल चीफ क्रिएटिव ऑफिसर असेलेल्या एका माजी अधिकाऱ्याने या केळी वाणाचा सर्वप्रथम ट्विटरवर उल्लेख केला. ज्यात त्यांनी म्हटले आहे की, आजपर्यंत कोणी मला ‘ब्लू जावा’ ही केळी लागवड करण्याबाबत का सुचविले नाही? या प्रजातीच्या केळीची चव ही पूर्णपणे आइसस्क्रीमसारखी आहे. तेव्हापासून हे केळी वाण जगभर प्रसिद्ध झाले असून, ते आता महाराष्ट्राच्या मातीत देखील फुलले आहे.

कुठे-कुठे होते शेती? : ‘ब्लू जावा’ केळी वाणाची लागवड ही प्रामुख्याने दक्षिण-पूर्व अमेरिकी देशांमध्ये पाहायला मिळते. अमेरिकेतील हवाई प्रांतात ही केळी विशेष प्रसिद्ध आहे. या वाणाचे केळी वाण हे १५ ते २० फुटांपर्यंत वाढते. याशिवाय ही केळी आग्नेय आशियामध्ये देखील आढळतात. या केळी वाणाची निर्मिती ही मुसा बाल्बिसियाना आणि मुसा एक्युमिनाटा या दोन संकरित वाणापासून झाली आहे. या निळ्या केळीमध्ये फायबर, मॅंगनीज आणि जीवनसत्त्वे ६ आणि जीवनसत्व सी मोठ्या प्रमाणात असते. याशिवाय काही प्रमाणात लोह, फॉस्फरस, थायामिन आणि सेलेनियम आढळते.

‘ब्लू जावा’ वाणाची वैशिष्ट्ये: ‘ब्लू जावा’ वाणाचे फळ हे मध्यम आकाराचे असते. केळीच्या एका फणीत १० ते १२ फण्या असतात. हे विदेशी वाण इतर स्थानिक वाणाप्रमाणेच दहा महिने कालावधीत काढणीला येते. ब्लू जावा केळीचा गर मलईसारखा असून, त्याची चव आईस्क्रीमसारखी असते. त्यामुळे या वाणाला ‘आईस्क्रीम केळी’ असे देखील म्हटले जाते.

‘ब्लू जावा’ केळीचे फायदे : ही केळी उच्च फायबरयुक्त असल्याने नेहमी आहारात असेल तर वजन कमी करण्यात मदत होते. नियमित खाल्ल्याने पचनास मदत होते. ज्यामुळे ही केळी मूळव्याध, पोटातील अल्सर आणि गॅस्ट्रोएसोफेजल रिफ्लक्स रोग यासह अनेक पाचक विकारांवर रामबाण उपाय ठरते. या वाणाच्या केळीमध्ये ॲंटिऑक्सिडंट्स मोठ्या प्रमाणात असते. ज्यामुळे ही केळी रोग प्रतिबंधात महत्त्वाची भूमिका बजावतात. हृदयरोग, मधुमेह आणि विशिष्ट कर्करोग यांसारख्या तीव्र परिस्थितींपासून संरक्षण करण्यास मदत करतात, असे मानले जाते. ज्यामुळे या वाणाला अधिक दर मिळतो.




## जागतिक दिवस:
## महात्मा गांधी जयंती
## लाल बहादूर शास्त्री जयंती
## बालसुरक्षा दिन
## स्वच्छता दिन

### महत्वाच्या घटना

१९०९ : रमाबाई रानडे यांनी पुणे सेवासदन सोसायटीची स्थापना केली.
१९२५ : जॉन लोगी बेअर्ड याने पहिल्या दूरदर्शन संचाचे प्रात्यक्षिक दाखवले.
१९५५ : पेरांबूर येथे ’इन्टिग्रल कोच फॅक्टरी’ सुरू झाली
१९५८ : गिनीला (फ्रान्सपासुन) स्वातंत्र्य मिळाले.
१९६७ : थरगुड मार्शल हे अमेरिकन सर्वोच्च न्यायालयाचे पहिले कृष्णवर्णीय न्यायाधीश बनले.
१९६९ : महात्मा गांधींच्या जन्मशताब्दीचे औचित्य साधून त्यांची प्रतिमा व सही असलेल्या २, ५, १० व १०० रुपयांच्या नोटा रिझर्व्ह बँकेने जारी केल्या.
१९९२ : साली झी टीवी चे संस्थापक सुभाषचंद्र यांनी देशातील पहिल्या खाजगी उपग्रह वाहिनीची सुरवात केली होती.
२००६ : निकेल माइन्स, पेनसिल्व्हानिया येथे चार्ल्स कार्ल रॉबर्ट्सने आमिश शाळेत पाच शाळकरी मुलींना गोळ्या घालून ठार मारले व नंतर आत्महत्या केली.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

९७१ : गझनीचा महमूद यांचा जन्म. (मृत्यू: ३० एप्रिल १०३०)
१८४७ : पॉल फॉन हिन्डेनबर्ग जर्मनीचे दुसरे राष्ट्राध्यक्ष (मृत्यू: २ ऑगस्ट १९३४)
१८६९ : महात्मा गांधी (मृत्यू: ३० जानेवारी १९४८ नवी दिल्ली)
१८९१ : विनायक पांडुरंग करमरकर शिल्पकार, १९२३ मधे पुण्याच्या श्री शिवाजी प्रिपरेटरी मिलिटरी स्कूलच्या आवारात बसवलेला शिवाजी महाराजांचा अश्वारुढ पुतळा त्यांनी बनवला आहे. पद्मश्री (१९६४) (मृत्यू: १३ जून १९६७) येथे क्लिक करा
१९०४ : लाल बहादूर शास्त्री स्वतंत्र भारताचे तिसरे पंतप्रधान. त्यांना मरणोत्तर ’भारतरत्न’ सन्मानाने गौरविण्यात आले होते. (मृत्यू: ११ जानेवारी १९६६)
१९०८ : गंगाधर बाळकृष्ण तथा ‘गं. बा.‘ सरदार विचारवंत व साहित्यिक, पुरोगामी चळवळीचे भाष्यकार, दलित साहित्य संमेलनाचे अध्यक्ष (१९७८), बार्शी येथील अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष (१९८०) (मृत्यू: १ डिसेंबर १९८८)
१९२७ : पं. दिनकर कैकिणी शास्त्रीय गायक (मृत्यू: २३ जानेवारी २०१०)
१९३९ : भारतीय क्रिकेटपटू बुद्धी कुंदर यांचा जन्म. (मृत्यू: २३ जून २००६)
१९४२ : आशा पारेख चित्रपट अभिनेत्री
१९४८ : पर्सिस खंबाटा अभिनेत्री, मॉडेल आणि लेखिका (मृत्यू: १८ ऑगस्ट १९९८)
१९६४ : साली प्रसिद्ध भारतीय राजकारणी व कार्यकर्त्या तसचं, स्वतंत्र भारतातील पहिल्या आरोग्यमंत्री महिला राजकुमारी अमृत कौर यांचे निधन.
१९६८ : याना नोव्होत्ना झेक लॉन टेनिस खेळाडू
१९७१ : कौशल इनामदार संगीतकार व गायक

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१९०६ : राजा रविवर्मा चित्रकार (जन्म: २९ एप्रिल १८४८)
१९२७ : स्वांते अर्हेनिअस स्वीडीश भौतिक व रसायनशास्त्रज्ञ (जन्म: १९ फेब्रुवारी १८५९)
१९८५ : रॉक हडसन अमेरिकन अभिनेता (जन्म: १७ नोव्हेंबर १९२५)
१९७५ : के. कामराज स्वातंत्र्यसैनिक, खासदार व तामिळनाडुचे मुख्यमंत्री (जन्म: १५ जुलै १९०३)

# कपाशीच्या पाते, फुल आणि बोंड लागण्याच्या कालावधीमध्ये घ्या काळजी

सध्या महाराष्ट्र मध्ये पावसाने खंड दिलेला आहे. त्यामुळे कपाशी सोबतच इतर पिकांना देखील पाण्याची दुर्भिक्ष जाणवत आहे. त्यामुळे खरीप पिकांच्या उत्पादनाला याचा फटका बसण्याची शक्यता आहे. परंतु अशाही परिस्थितीमध्ये जर आपण कापूस या पिकाचा विचार केला तर हा कालावधी कापूस पिकासाठी खूप महत्त्वाचा असून व्यवस्थापनाच्या दृष्टिकोनातून देखील या कालावधीचे महत्त्व खूप अनन्यसाधारण असे आहे.

साधारणपणे हा कालावधी कापूस पिकाला पाते, बोंड लागण्याचा कालावधी असून यावरच कपाशीचे पुढील उत्पादन अवलंबून असते. त्यामुळे हवामानातील बदल किंवा एखाद्या वेळेस जास्त पाऊस पडून गेल्यानंतर उद्भवणारी स्थिती किंवा पाण्याचा ताण पडल्यानंतर कापूस पिकावरील पाते आणि बोंडगळीची समस्या निर्माण होते. ही समस्या जर जास्त प्रमाणात उद्भवली तर नक्कीच उत्पादनावर त्याचा विपरीत परिणाम होतो. यामध्ये सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे जेव्हा कपाशीला अगदी सुरुवातीच्या काळामध्ये जे फुल येतात त्यांचे रूपांतर पाते आणि बोंडामध्ये होत असते. परंतु गेल्या काही वर्षापासून आपण बघत आहोत की याच कालावधीमध्ये नेमके पाने लाल पडण्याची विकृती म्हणजेच आपण त्याला लाल्या रोग म्हणतो याचा अटॅक कपाशीवर होताना दिसून येतो. याच्या नियंत्रणाकरिता आपल्याला मुख्य अन्नद्रव्य देणे गरजेचे आहेच परंतु त्यासोबतच इतर सूक्ष्म अन्नद्रव्यांची फवारणी देखील आवश्यक आहे. कपाशीवर लाल्या रोग येऊ नये याकरिता मॅग्नेशियम सल्फेट एक टक्के म्हणजेच दहा ग्रॅम आणि त्यासोबत युरिया एक टक्के म्हणजेच दहा ग्रॅम प्रति लिटर पाणी याप्रमाणे फवारणी करावी. ही फवारणी करताना कुठल्याही प्रकारचा कीडनाशकाचा यामध्ये समावेश करू नये. दुसरे महत्त्वाचे म्हणजे पीक जेव्हा फुलोरा अवस्थेमध्ये असते तेव्हा दोन टक्के युरिया किंवा दोन टक्के डीएपी म्हणजेच वीस ग्रॅम प्रति लिटर पाणी किंवा १९:१९:१९ पाच ग्रॅम प्रति लिटर पाणी प्रमाणे या अन्नद्रव्यांचे लागवडीच्या ४५ व ६५ व्या दिवशी फवारणी करावी. तसेच फुलोरा अवस्थेमध्ये पीक असेल तर ००:५२:३४ चार ग्रॅम प्रति लिटर पाणी याप्रमाणे फवारणी करावी. फुलोरा अवस्थे नंतर पाते व बोंडे तयार होतात व ही अवस्था खूप महत्त्वाची असते. या कालावधीमध्ये पोटॅशियम नायट्रेट एक टक्का म्हणजेच दहा ग्रॅम प्रति लिटर पाणी घेऊन फवारणी करावी. अनेक नैसर्गिक कारणांमुळे किंवा इतर कारणांमुळे देखील कपाशीची पाते, बोंडांची मोठ्या प्रमाणावर गळ होते.

# ओला दुष्काळ जाहीर करा; पूर्णा तहसील कार्यालयावर शेतकऱ्यांचा बैलगाडी मोर्चा

परभणी। प्रतिनिधी

तालुक्यातील सहा महसूल मंडळांमध्ये सप्टेंबर महिन्यात वारंवार झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. परंतु, महसूल व कृषी प्रशासन तसेच राज्य सरकारकडून शेतकऱ्यांच्या समस्यांकडे दुर्लक्ष गेल्यामुळे संतप्त शेतकऱ्यांनी पूर्णा तहसील कार्यालयावर भव्य बैलगाडी मोर्चा काढला.

हजारो शेतकरी व शेकडो बैलगाड्यांसह निघालेल्या या मोर्चात ओला दुष्काळ जाहीर करा, पिकविमा भरपाई द्या, कर्जमाफी करा अशा मागण्यांचे जोरदार घोषवाक्ये देण्यात आली. या वेळी शेतकरी नेते नरेश जोगदंड, माणिकराव सुर्यवंशी, शिवहार सोनटक्के, मुंजाभाऊ जोगदंड, माधुरी क्षिरसागर, नामदेव कदम, भोसले, सैनाजी माठे, किशोर ढगे यांनी प्रशासन आणि सरकारवर तीव्र शब्दांत हल्ला चढवला. अतिवृष्टीमुळे खरीपातील पिके उद्ध्वस्त झाली, जमिनी वाहून गेल्या, घरे पडली, संसारोपयोगी वस्तू व जनावरे वाहून गेली. या संकटामुळे शेतकरी कर्जबाजारी होऊन आत्महत्येच्या मार्गाकडे वळू लागल्याचे नेत्यांनी सांगितले. शेतकऱ्यांनी आरोप केला की शासनाने मदतीसाठी केवळ दोन हेक्टरची मर्यादा ठेवून अनुदानाची रक्कम १३,५०० रुपयांवरून ८,५०० रुपयांवर आणली. तसेच पिकविमा योजनेतील जाचक अटींमुळे शेतकऱ्यांना योग्य भरपाई मिळण्याची शक्यता नाही. महसूल प्रशासन पिकांचे केवळ ६० टक्के नुकसान झाल्याचा अहवाल देत आहे; मात्र खरी परिस्थिती शंभर टक्के बाधित पिकांची आहे, असा दावा करण्यात आला. तहसील कार्यालयाच्या प्रवेशद्वारावर शेतकऱ्यांनी ठिय्या मांडत प्रशासनाविरोधात घोषणाबाजी केली. ''शासनाने तात्काळ ओला दुष्काळ जाहीर करून पीकविमा भरपाई, कर्जमाफी व शेतकऱ्यांना भरीव मदत द्यावी, अन्यथा तीव्र आंदोलन छेडले जाईल,'' असा इशारा शेतकऱ्यांनी दिला.



## अतिवृष्टीग्रस्त एकही शेतकरी मदतीपासून वंचित राहणार नाही – दादाजी भुसे

### हिंगोली जिल्ह्यात नुकसानीची केली पाहणी



हिंगोली/गोपाल सातपुते

हिंगोली जिल्ह्यात सतत पडलेल्या पावसामुळे शेतकऱ्यांची मोठ्या प्रमाणावर शेती पिकांचे व आर्थिक नुकसान झाले आहे. नुकसानग्रस्त एकही शेतकरी मदतीपासून वंचित राहणार नाही, असे प्रतिपादन शालेय शिक्षणमंत्री दादाजी भुसे यांनी व्यक्त केले. ते सेनगाव तालुक्यातील अतिवृष्टीने झालेल्या नुकसानीची पाहणी केली. त्यावेळी त्यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधला.

यावेळी आमदार डॉ. प्रज्ञाताई सातव, आमदार संतोष बांगर, जिल्हाधिकारी राहुल गुप्ता, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी अंजली रमेश, पोलिस अधिक्षक श्रीकृष्ण कोकाटे, उपविभागीय अधिकारी समाधान घुटुकडे, तहसीलदार श्रीकांत भुजबळ, जीवककुमार कांबळे, जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी राजेंद्र कदम यांच्यासह संबंधित विभागांचे वरिष्ठ अधिकारी आदींसहीत शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. शिक्षणमंत्री भुसे यांनी यावेळी तातडीने पंचनामे पूर्ण करून अहवाल पाठविण्याचे निर्देश दिले. तसेच शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी शासनाच्या विविध मदत योजनांतर्गत कार्यवाही करण्यात येईल, असे आश्वासन त्यांनी दिले.

## बळीराजाला आधार देण्याकरिता आ. कराड बांधावर

लातूर। प्रतिनिधी

लातूर ग्रामीण मतदार संघांतर्गत असलेल्या लातूर तालुक्यातील गावांत सततचा मुसळधार पाऊस आणि अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसाणीची पाहणी भाजप-आमदार रमेशआप्पा कराड यांनी सोमवारी (दि.२९) थेट बांधावर जाऊन केली. यावेळी त्यांनी शेतकरी आणि ग्रामस्थांशी संवाद साधून त्यांच्या अडचणी समजून घेतल्या आणि शासनाच्या मदतीची खात्री दिली.

आ. कराड यांनी नागझरी, जेवळी, टाकळी, काडगाव, गाधवड, तांदूळजा, कानडी बोरगाव, भिसे वाघोली, माटेफळ, करकट्टा, भोसा, मसला, माटेफळ, करकट्टा यासह अनेक नुकसानग्रस्त गावांची पाहणी केली. शेतकऱ्यासह नागरिकांनी दिलेल्या निवेदनाचा स्वीकार केला. कानडी बोरगाव बॅरेजचे दरवाजे दुरुस्त करावेत. भिसेवाघोली येथे रस्त्यालगत खचलेल्या विहिरमुळे बस सेवा बंद झाली असून त्या ठिकाणी तात्काळ संरक्षण भिंत बांधावी निळकंठ गावालगतच्या ओढ्यावरील पुलाची तात्पुरती दुरुस्ती करावी, कळंब-लातूर मेन रोडवरील काडगाव येथील चौकात सातत्याने पाणी साचत असल्याने रस्त्याची उंची वाढवण्याची सूचना आ. रमेशआप्पा कराड यांनी संबधीत यंत्रनेला केली. यावेळी त्यांच्या समवतेत भाजपा किसान मोर्चाचे विक्रम शिंदे, भागवत सोट, नवनाथ भोसले, सुरज शिंदे, प्रताप पाटील, सतीश आंबेकर, हनुमंतबापू नागटिळक, बन्सी भिसे, वैभव सापसोड आदींसह अनेकांची तसेच संबधीत मविभागांच्या अधिकाऱ्यांची उपस्थिती होती.

## जिल्हा रुग्णालयातील एमआरआय मशीन धुळखात पडून

जालना । प्रतिनिधी

जिल्हा सामान्य रुग्णालयाला वर्षभरापुर्वी प्राप्त झालेले आधुनिक एमआरआय मशीन अजूनही कार्यान्वित करण्यात आलेले नसून, लाखो रुपये किमतीची ही यंत्रसामग्री धुळखात पडून असल्यामुळे गोरगरिबांना त्याचा काहीएक उपयोग होत नाही. याप्रकरणी जिल्ह्याच्या पालकमंत्री पंकजा मुंडे यांनी लक्ष घालून संबंधित जिल्हा शालेय चिकित्स डॉ. राजेंद्र पाटील यांना एमआरएम मशीन चालू करण्यासंदर्भात आदेश करावे, अशी मागणी सर्वसामान्य नागरेकडून करण्यात येत आहे.

तपासणीसाठी गरीब नागरिकांना आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत आहे. ही मशीन तात्काळ सुरू न केल्यास रुग्णहितास्तव मराठा महासंघ रस्त्यावर उतरुन तीव्र आंदोलन छेडेल, असा इशारा जिल्हाध्यक्ष अरविंद देशमुख यांनी दिला आहे. यासंदर्भात प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात श्री. देशमुख यांनी म्हटले आहे की, अनेक आजाराच्या निदानासाठी एमआरआय मशिन अत्यावश्यक झालेली आहे. अशा तपासणीसाठी खाजगी रुग्णालयांमध्ये ६ ते ८ हजार रुपये शुल्क आकारले जाते. हे शुल्क गोरगरिब रुग्णांच्या आवाक्याबाहेर असल्यामुळे शासकीय रुग्णालयात मोफत सुविधा मिळण्याच्या दृष्टीकोनातून हे एमआरआय मशीन शासनाने उपलब्ध करुन दिलेले आहे. हे मशिन प्राप्त होवून १ वर्ष उलटलेतरी ते बंद अवस्थेत असून, धुळखात पडले आहे. हा रुग्णांच्या जीवाशी खेळ चालू आहे. मशीन सुरु न होण्यामागे खासगी व्यवसायिकांचे दबावाचे राजकारण असल्याचे सांगण्यात येते. अर्थमंत्री अजित पवार यांच्या हस्ते उद्घाटन करण्यासाठी जाणीवपुर्वक ते वापरात घेतले जात नसल्याचे जिल्हा सामान्य रुग्णालयातील काही कर्मचाऱ्यांनी खाजगीत बोलताना सांगितले. तसे असेल तर हे दुर्दैवी असून, खाजगी एमआरआय सेंटरच्या दबावामुळे गरीब रुग्णांची अडवणूक केली जात असेल तर हा अक्षम्य गुन्हा आहे. केलेला गंभीर खेळ आहे. जिल्हा शल्यचिकित्सकांनी तात्काळ दखल घेवून हे एमआरआय मशीन सुरु करावे; नसता मराठा महासंघाच्यावतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल,



गुरुवर्य गोकुळनाथ महाराज (शिव गोरक्षनाथ धाम अंबड) यांच्या अभिष्टचिंतन निमित्त महाराष्ट्राचे सुप्रसिद्ध गायक आकाश शिंदे यांच्या नाथभक्ती गीताचा कार्यक्रम मारवाडी युवा मंच अंबड शाखेच्यावतीने ठेवण्यात आला होता. कार्यक्रमात आलेल्या सर्व नाथभक्ताना थंड पाणी वाटपाचे कार्यक्रम आयोजित केले होते. प्रांतीय अध्यक्ष कैलास राठी अध्यक्ष, संतोष जोशी उपाध्यक्ष, राम पटवारी सचिव, शुभम जोशी, शैलेश तिवारी, सचिन जोशी व सर्व पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते.

जाहिर प्रगटन

### तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड

**दुरध्वनी क्रमांक : ०२-४८३-२७५०२६**
**जा..क्र.२०२५/ सेतु/कावि-५६७**
**दिनांक - २५/०९/२०२५**

तहसिलदार तथा कार्यकारी दंखाधिकारी, अंबड यांचे न्यायालय

अर्जदार श्रीमान/श्रीमती सयफुद्दिन नाजीमोद्दिन तांबोळी रा. जामखेड ता. अंबड जि. जालना यांनी यांच्या स्वतःच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | सयफुद्दिन नाजीमोद्दिन तांबोळी | स्वतः | ०१/०७/१९७२ |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक-२५/०९/२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित**
**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

जाहिर प्रगटन

### तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड

**दुरध्वनी क्रमांक : ०२-४८३-२७५०२६**
**जा..क्र.२०२५/ सेतु/कावि-६९४**
**दिनांक - २५/०९/२०२५**

तहसिलदार तथा कार्यकारी दंखाधिकारी, अंबड यांचे न्यायालय

अर्जदार श्रीमान/श्रीमती इलियास उसमान तांबोळी रा. जामखेड ता. अंबड जि. जालना यांनी यांच्या स्वतःच्या जन्म /मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | इलियास उसमान तांबोळी | स्वतः | ०१/०१/१९५३ |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक-२५/०९/२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित**
**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

## मातंग संघटना घराघरात जाऊन समाजसेवा करणार



अंबड। प्रतिनिधी

अंबड येथे मातंग एकता आंदोलन या संघटनेची चिंतक बैठक ३० सप्टेंबर रोजी आयोजित करण्यात आली होती. त्या बैठकीमध्ये प्रदेश उपाध्यक्ष शिवाजी घुले यांनी समाजाला व कार्यकर्त्यांना मोलाचे मार्गदर्शन केले.

या प्रसंगी बैठकीला मातंग एकता आंदोलनचे जिल्हा अध्यक्ष राजुभाऊ जाधव, महिला आघाडी जिल्हाध्यक्ष मारीयाताई बाळ सराफ व सुनिल काळुके, दानियल निर्मळ, भिवराज सकट, सुनिल डोईफोडे, साळीकराम बाळ सराफ, राम पिसोळे, किशोर निर्मळ, शरद घुले, आशोक पांजगे, सुकदेव सोनवने, सुकदेव डोईफोड, रवी साठे, संजय काते, सुनिल रोकडे, जिल्ह्या व तालुक्याचे पदाधिकारी व शेकडो कार्यकर्ते बैठकीला उपस्थित होते. बैठकमध्ये काही कार्यकर्ते यांना नियुती पत्र देऊन त्यांचा देखील सन्मान करण्यात आला. काही नविन कार्यकर्तेवर संघटनेची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. सर्वप्रथम महिला जिल्हाउपध्यक्षपदी वंदनाताई गवळी यांची निवड करण्यात आली. महिला तालुका अध्यक्षपदी दैवशालाताई गवळी, तालुका संघटकपदी अनिल आहिरे यांना नियुक्ती देण्यात आली. सोशल मिडिया जिल्हा अध्यक्षपदी संदिप थोरात यांना देण्यात आले, जिल्हा सचिवपदी कमलाकर घुले यांना देण्यात आले. असे अनेक कार्यकर्ते व जिल्हा अध्यक्ष राजुभाऊ जाधव व प्रदेश उपाध्यक्ष शिवाजीदादा घुले यांनी जबाबदाऱ्या सोपविल्या आहेत. पुढील काळात मातंग एकता आंदोलन संघटना ही समाजाच्या घराघरात जाऊन समाजाच्या हिताचे व समाजसेवा करण्याचे काम करणार आहे. असे या बैठकीमध्ये सांगण्यात आले.

## हदगल निवासी उपजिल्हाधिकारी तर महाडिक निवडणूक उपजिल्हाधिकारी

जालना। प्रतिनिधी

जालन्याचे उपजिल्हा निवडणुक अधिकारी शशिकांत हदगल यांची निवासी उपजिल्हाधिकारी पदावर बदली झाली असून, शासनाचे उपसचिव महेश वरुडकर यांनी यासंदर्भातील आदेश काढले आहेत. तर निवडणूक उपजिल्हा अधिकारी गणेश महाडिक यांचे नियुक्ती करण्यात आली आहे.

हा प्रकार अनुदान घोटाळा प्रकरणी मुळे बदली झाल्याचे जिल्हा प्रशासन अधिकाऱ्याकडून बोलल्या जात आहे. राज्यातील शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियम आणि शासकीय कर्तव्ये पार पडतांना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम २००५ च्या कलम ४ (४) व ४ (५) मधील तरतुदींनुसार उपजिल्हाधिकारी संवर्गातील अधिकाऱ्यांची प्रशासकीय कारणास्तव प्रशासकीय सोयीच्यादृष्टीने पदस्थापना देण्यात येते. त्यानुसार जालन्याचे उपजिल्हा निवडणूक अधिकारी शशिकांत हदगल यांची निवासी उपजिल्हाधिकारी या पदावर बदली करण्यात येत असल्याचे महेश वरुडकर यांनी काढलेल्या आदेशात नमुद केले आहे.

जाहिर प्रगटन

### तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड

**दुरध्वनी क्रमांक : ०२-४८३-२७५०२६**
**जा..क्र.२०२५/ सेतु/कावि-७०३**
**दिनांक - २४/०९/२०२५**

तहसिलदार तथा कार्यकारी दंखाधिकारी, अंबड यांचे न्यायालय

अर्जदार श्रीमान/श्रीमती मुदसर इलियास तांबोळी रा. जामखेड ता. अंबड जि. जालना यांनी यांच्या स्वतःच्या जन्म /मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | मुदसर इलियास तांबोळी | स्वतः | ०३/०५/१९८५ |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक-२४/०९/२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित**
**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

जाहिर प्रगटन

### तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड

**दुरध्वनी क्रमांक : ०२-४८३-२७५०२६**
**जा..क्र.२०२५/ सेतु/कावि-६९९**
**दिनांक - २४/०९/२०२५**

तहसिलदार तथा कार्यकारी दंखाधिकारी, अंबड यांचे न्यायालय

अर्जदार श्रीमान/श्रीमती मुजीब इलियास तांबोळी रा. जामखेड ता. अंबड जि. जालना यांनी यांच्या स्वतःच्या जन्म /मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | मुजीब इलियास तांबोळी | स्वतः | २१/०४/१९८१ |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक-२४/०९/२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित**
**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

जाहिर प्रगटन

### तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड

**दुरध्वनी क्रमांक : ०२-४८३-२७५०२६**
**जा..क्र.२०२५/ सेतु/कावि-६९५**
**दिनांक - २४/०९/२०२५**

तहसिलदार तथा कार्यकारी दंखाधिकारी, अंबड यांचे न्यायालय

अर्जदार श्रीमान/श्रीमती आमेर इलियास तांबोळी रा. जामखेड ता. अंबड जि. जालना यांनी यांच्या स्वतःच्या जन्म /मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | आमेर इलियास तांबोळी | स्वतः | ०२/०३/१९९८ |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक-२४/०९/२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित**
**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

## राजस्थानी महिला मंडळाच्या वतीने गरबा उत्सवात सांस्कृतिक कार्यक्रमांची धमाल

मंठा । प्रतिनिधी

मंठा येथील राजस्थानी महिला मंडळाच्या वतीने श्री लक्ष्मीनारायण मंदिरात शारदीय नवरात्री निमित्त भव्य गरबा उत्सवाचे आयोजन करण्यात आले. सर्व महिला पदाधिकाऱ्यांनी नवरात्र उत्सवासाठी अथक परिश्रम घेतले.



शारदीय नवरात्र उत्सवात भव्य दांडिया कार्यक्रमासह फॅन्सी ड्रेस स्पर्धा, भजन, नवदुर्गा, मंगल पाठ आदी कार्यक्रम उत्साही वातावरणात पार पडले. या उत्सवात महिषासुर वधाचे उत्कृष्ट सादरीकरण करण्यात आले. या सादरीकरणात नेतल दायमा, रिया दायमा, मेघा भुतडा, वैष्णवी दायमा, प्रांजल लट्टुरिया, अमृता मुरक्या, प्रियांका दायमा, साक्षी तायल, लक्ष्मी सोमाणी, ममता भुतडा, गीता दायमा, प्रीती राठी, सुषमा मुरक्या, पुनम बलदवा, ज्योती मुरक्या, प्रिया मुरक्या, राधिका राठी यांनी प्रभावी भूमिका साकारल्या, तर महिषासुरची भूमिका सिद्धी तायल हिने नृत्यभिनयाने प्रस्तुत केली. या प्रसंगी आनंदराम सोमानी, गिरीश मुरक्या, राजेश मणियार, योगेश भुतडा, गणेश बियाणी आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मंडळाच्या अध्यक्षा सौ. शितल शरद मुरक्या, उपाध्यक्षा सौ. ममता दायमा, कोषाध्यक्षा सौ. राखी मणियार, सचिव सौ. पूनम बलदवा, सदस्य वर्षा सोमानी, पूनम साबू यांच्यासह सर्व मंडळाच्या पदाधिकारी, सदस्या, समाजातील महिला भगिनी व समाजबांधवांनी अथक परिश्रम घेतले.

# कपिलधारवाडीत घराला तडे, रस्त्याला पडल्या भेगा

## ग्रामस्थ भयभीत ८० जणांचे स्थलांतर, आ.रोहित पवार, आ.संदीप क्षीरसागर, तहसीलदार शेळके यांची भेट, डॉ.ज्योती मेटे यांनी दिले पालकमंत्र्यांना निवेदन

बीड । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील कपिलधार वाडीमध्ये मागील काही दिवसांपासून घरांना तडे पडणे आणि रस्त्याला मोठमोठ्या भेगा पडल्याने ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. कपिलधार वाडी ही पायथ्याशी वसलेली असून येथे १०० घरे आणि सुमारे ५०० लोकसंख्या आहे. रात्री १२ वाजता अनेक गावकऱ्यांनी सुरक्षिततेसाठी तीर्थक्षेत्रात स्थलांतर केले, तर काही जण पाहुण्यांकडे गेले.

ग्रामस्थांनी प्रशासनाकडे तात्पुरती स्थलांतराची व्यवस्था आणि नुकसान भरपाईसाठी मागणी केली आहे. कपिलधार वाडीची माळीण होते की काय? अशी भिती निर्माण झाली असून, त्यामुळे गावकऱ्यांनी रात्र जागून घालवली. ज्या लोकांना शक्य होते त्यांनी रात्रीच स्थलांतर केले, मात्र उरलेल्या लोकांसाठी प्रशासनाने तातडीने मदत करावी, असे ग्रामस्थांनी सांगितले. रस्त्याला पडलेल्या भेगा व घरांवरील तडे पाहण्यासाठी तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी घटनास्थळी भेट दिली. त्यांच्यासोबत वरिष्ठ भू-वैज्ञानिक शंकर काळे देखील होते. भू-वैज्ञानिकांच्या मते, मागील काही दिवसांत झालेल्या पावसामुळे जमीन साठवलेले पाणी ५०-६० मीटर खोलवर गेले आहे. त्यामुळे जमीन जो कमकुवत भाग आहे तिथून हवा बाहेर पडल्याने घरांना व रस्त्याला तडे पडले आहेत. भू-



वैज्ञानिक काळे यांनी ग्रामस्थांना सांगितले की, या भागात आणि परिसरात भूकंपाची कोणतीही नोंद नाही. त्यामुळे सध्या कोणताही धोका नाही, ग्रामस्थांनी घाबरू नये. दरम्यान, आमदार संदीप क्षीरसागर आणि आमदार रोहित पवार यांनी देखील ग्रामस्थांची भेट घेतली आणि त्यांची काळजी व्यक्त केली. काही नागरिकांचे स्थलांतर केले गेले असून, प्रशासनाने त्यांच्या पुनर्वसनासाठी जिल्हाधिकाऱ्यांकडे प्रस्ताव पाठविला आहे. ग्रामस्थांच्या सुरक्षिततेसाठी प्रशासन सतर्क असून, भविष्यात अशा प्रकारच्या धोके टाळण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्याचे आश्वासन देण्यात आले आहे.



### ग्रामस्थांची प्रतिक्रिया:

कपिलधार वाडीतील घरांना तडे पडल्याने आणि रस्त्यावर मोठ्या भेगा पडल्याने ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. राहण्याची सोय करून नुकसान भरपाई द्यावी. कपिलधार वाडीची माळीण होते की काय? अशी भितीने गावकऱ्यांनी रात्र जागून घालवली, असे अमोल शिंदे, ग्रामस्थ, म्हणाले. ज्यांना शक्य होते त्यांनी रात्रीच स्थलांतर केले, मात्र उरलेल्या लोकांसाठी प्रशासनाने तात्पुरती स्थलांतराची व्यवस्था करून पुनर्वसन करावे, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

### प्रशासन सर्तक, तूर्तास धोका नाही-तहसीलदार

बीड तालुक्यातील कपिलधार वाडीतील घरांना तडे पडल्याची व रस्त्यांवर मोठ्या भेगा निर्माण झाल्याची माहिती मिळाल्यानंतर तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी वरिष्ठ भू-वैज्ञानिक शंकर काळे यांना सोबत घेऊन घटनास्थळी भेट दिली. भू-वैज्ञानिकांच्या मते, मागील काही दिवसांत झालेल्या पावसाचे पाणी जमीन ५० ते ६० मीटर खोलवर शिरल्यामुळे जमिनीचा कमकुवत भाग फुगल्यासारखा झाला आहे. त्यातून हवा बाहेर पडल्यामुळे घरांना आणि रस्त्याला तडे पडले आहेत. तथापि, सध्या या भागात कोणताही धोका नाही, आणि परिसरात भूकंपाची कोणतीही नोंदही नाही, त्यामुळे ग्रामस्थांनी घाबरू नये, असे त्यांनी स्पष्ट केले. सध्या काही नागरिकांचे स्थलांतर करण्यात आले असून, ग्रामस्थांनी पुनर्वसनासाठी मागणी केली आहे. या मागणीनुसार जिल्हाधिकाऱ्यांना प्रस्ताव पाठविण्यात आला आहे. तहसीलदार शेळके यांनी सांगितले की, प्रशासन सर्तक असून, ग्रामस्थांच्या सुरक्षिततेसाठी तातडीने आवश्यक पावले उचलली जात आहेत.

# दसरा मेळाव्यास मोठ्या संख्येने उपस्थित रहा - संतोष थोरात

गेवराई । प्रतिनिधी

भगवान भक्तीगड, सावरगाव घाट येथे राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे यांच्या नेतृत्वात दसरा मेळावा होणार आहे, यात लाखोंच्या संख्येने जनसमुदाय उपस्थित राहणार आहे. यासाठी गेवराई तालुक्यामधून मोठ्या संख्येने उपस्थित राहण्यासाठी नियोजनात्मक बैठक भाजपा गेवराई तालुका कार्यालयात पार पडली. यावेळी भाजपा नेते श्रीकांत सानप यांनी सांगितले की, स्वर्गीय लोकनेते गोपीनाथ मुंडे यांनी सुरु केलेली दसरा मेळाव्याची प्रथा समाजातील सर्व जाती पाती



मधील वंचित उपेक्षित घटक व ऊसतोड कामगार यांना विचारूपी सोनं वाटून त्यांच्यात संघर्ष करण्याचा आत्मविश्वास जागृत केला. आणि समाजाला एक नवी दिशा दिली. त्याच मार्गावर पंकजाताई मुंडे या दसरा मेळाव्याच्या माध्यमातून समाजाला विशेष करून तरुण वर्गाला दिशा देत आहेत. अशा नेतृत्वाचे हात बळकट करण्यासाठी आपण सर्वांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन श्रीकांत सानप यांनी केले आहे.

यावेळी भाजपा जेष्ठ नेते देविदास नागरगोजे, प्रकाश सुरवसे, ◀◀ पान २ वर

# पाटोदा नगरपंचायतला सफाई कामगारांनी ठोकले कुलूप!



पाटोदा । प्रतिनीधी

पाटोदा नगरपंचायत हद्दीमध्ये गेल्या अनेक वर्षांपासून सफाई कामगार म्हणून कार्यरत असलेल्या महिला व पुरुष कर्मचाऱ्यांना अद्यापही शासन निर्णय २०१६ नुसार नियमित नियुक्तीपत्र मिळालेले नाही. या गंभीर प्रश्नाकडे प्रशासन दुर्लक्ष करीत असल्याचा आरोप कामगारांनी केला आहे.या कारणामुळे ◀◀ पान २ वर

# गेवराई परिसरात बिबट्या आढळला नागरिकांमध्ये भितीचे वातावरण

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील उमापूर-राक्षसभुवन शेत शिवारात बिबट्या आढळून आल्याने खळबळ उडाली असून, परीसरात भितीचे वातावरण निर्माण झाले आहे. मात्र, तो बिबट्याच होता का, या विषयी वन विभागाने खात्री करून घ्यावी, अशी मागणी शेतकर्यांनी केली आहे. सदरील प्राण्यांच्या पायाचे ठसे छायाचित्रात स्पष्ट दिसत आहेत. दरम्यान, मंगळवार ता. ३० रोजी उमापूर - राक्षसभुवन परीसरात



दुपारी दोन वाजता एक बिबट्या सदृश मादी आणि तीन पिल्ले दिसल्याचे शेतकर्यांनी सांगितले आहे.

गेवराई तालुक्यातील उमापूर-राक्षसभुवन रस्त्यावरच्या शिवारात एक बिबट्या आणि तीन पिल्ले आढळून आली आहेत. मंगळवार ता. ३० रोजी दुपारी शेत शिवारातून वस्तीवर जाणाऱ्या शेतकर्याने बिबट्याला पाहिले आहे. या घटनेने परिसरात खळबळ उडाली असून, शेतात जाणाऱ्यांनी स्वतःची काळजी घ्यावी,असे आवाहन करण्यात आले आहे. या आधी ही, गेवराई तालुक्यातील विविध भागात बिबट्या आढळून आला होता. वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी ◀◀ पान २ वर

# वैष्णोदेवी मंदिर येथे नवचंडी याग संपन्न

## दसरा मेळाव्याला मोठ्या संख्येने उपस्थित रहा -संतोष सोहनी

बीड । प्रतिनिधी

बीड शहरातीलच नाहीतर जिल्हाभरातील भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या बीड शहरातील विप्र नगर येथील वैष्णोदेवी मंदिर संस्थान येथे दरवर्षीप्रमाणे याही वर्षी नवरात्रोत्सव मोठ्या उत्साहात आणि भक्तिभाव च्या वातावरणात संपन्न होत आहे. सकाळ आणि सायंकाळी देवीची महाआरती,



त्याचबरोबर विविध धार्मिक कार्यक्रम आणि भव्य असे रक्तदान शिबिर घेण्यात आले तर आज मंगळवारी नवचंडी याग संपन्न झाला. उद्याच्या दसरा मेळाव्याला नागरिकांनी वैष्णोदेवी मंदिर येथे उपस्थित रहावे असे आवाहन वैष्णोदेवी मंदिर संस्थांचे संस्थापक अध्यक्ष संतोष सोहनी कोषाध्यक्ष संजय सोहनी यांच्यासह आदींनी केले आहे.

# उमापूर फाट्यावर धनगर समाजाचा एस टी आरक्षणासाठी रस्तारोको

गेवराई । प्रतिनिधी

धनगर समाजाच्या एसटी आरक्षण अंमलबजावणीच्या मागणीसाठी जालना येथे १७ सप्टेंबर २०२५ पासून दीपक बोराडे उपोषणाला बसले आहेत. दीर्घकाळ उपोषण सुरू असल्याने त्यांची तब्येत खालावली असून, या बातमीमुळे धनगर समाज बांधव संतापले आणि आक्रमक झाले काल बुधवार रोजी सकाळी उमापूर सर्कल च्या वतिने उमापूर फाटा येथे एक तास रस्तारोको आंदोलन करण्यात आले यावेळी पोलीसांनी चोख बंदोबस्त ठेवला होता.



धनगर समाजाची प्रमुख मागणी एसटी आरक्षणाच्या अंमलबजावणीची आहे. मेंढपाळ, धनगर, हाटकर हे समाज पारंपारिकपणे भटकंती करणारे आणि आर्थिक तसेच सामाजिकदृष्ट्या मागासलेले आहेत. त्यांना न्याय देण्यासाठी एसटी आरक्षणाची अंमलबजावणी तातडीने करावी, यासाठी समाज गेली अनेक वर्षे सातत्याने संघर्ष करत आहे दिपक बोराडे हे जालना येथे उपोषण करीत आहेत १ऑक्टोबर रोजी सकाळी अकराच्या सुमारास उमापूर फाटा येथे शेकडो धनगर समाज बांधव राज्य महामार्गावर जमले आणि त्यांनी रास्ता रोको आंदोलन सुरू केले. यावेळी आंदोलकांनी जोरदार घोषणाबाजी करत परिसर दणाणून सोडला गेवराई शेवगाव मार्गावरील उमापूर फाट्यावर झालेल्या आंदोलनाने दोन्ही बाजूंना वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. काही काळ वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली यावेळी सकळ धनगर समाज उमापूर सर्कलच्या वतीने सपोउप निरिक्षक पानपाटील यांनी प्रशासनाच्या वतिने निवेदण स्विकारले.

# जवळा येथे बैलगाडी विहिरीत पडून बैल दगावला

दिंद्रुड । प्रतिनिधी

धारूर तालुक्यातील फकीर जवळा येथील शेतात ओढ्याच्या साईडने बैलगाडी घेऊन निघालेल्या गड्यासह बैलगाडी जुन्या विहिरीत पडली. मात्र या अपघातात एक बैल व गडी सुरक्षित असून एक बैल दगावल्याची घटना काल (दि ०१ आक्टोंबर) बुधवारी दुपारी घडली.

दिंद्रुड पंचक्रोशीतील फकीर जवळा येथील शेतकरी त्रिंबक बालासाहेब साबळे यांचा गडी भास्कर शिंदे हा गावालगत असलेल्या त्यांच्या गट क्रमांक १० मधील शेतात ओढ्याच्या



कडेने बैलगाडी घेऊन विहिरी जवळून जात असताना अचानक बैलांनी ओढल्याने बैलगाडी विहिरीत गेली. यात एक बैल गाडीला अडकल्याने त्याचा दुर्दैवी मृत्यू झाला मात्र सुदैवाने एका बैलाचा व गड्याचा जीव वाचला. घटनेची माहिती कळताच गावातील जमाव मोठ्या संख्येने जमला अन् जेसीबीच्या साह्याने बैल व बैलगाडी बाहेर काढण्यात आली. अगोदरच अतिवृष्टीमुळे पिके गेली आणि आता या घटनेने जवळा परिसरात शेतकऱ्यावर आलेल्या अस्मानी संकटामुळे हळहळ व्यक्त होत आहे. तलाठी पुजा आठवले, कृषी सहायक पी गवारे यांनी सरपंच, ग्रामस्थांसमक्ष पंचनामा केला असून, प्रशासनाने शेतकऱ्याला आर्थिक मदत करण्याची मागणी होत आहे.

# दसऱ्या मेळाव्यास लाखोंच्या संख्येने उपस्थित रहा -संजय आंधळे

वडवणी । प्रतिनिधी

लोकनेते स्व.गोपीनाथराव मुंडे साहेबांनी स्थापन केलेल्या दसरा मेळाव्याला आता विराट स्वरुप झाले आहे, समाज बांधव या दिवसाची आतुरतेने वाट पाहत असतो, भारतीय जनता युवा मोर्चाचे जिल्हा अध्यक्ष संजय भाऊ आंधळे यांनी मागच्या आठ दिवसापासून संपूर्ण बीड जिल्ह्या सह वडवणी तालुका पिंजून काढत समाज बांधवांना भगवान भक्ती गडावर



उपस्थित राहण्याची आव्हान केले,ओला दुष्काळ सदृश्य परिस्थिती आहे ,शेतकरी मेटाकुटीला आले आहे, अशा परिस्थितीतही ना. पंकजाताई मुंडे यांचे विचार ऐकण्यासाठी , भाजपाचे ध्येय धोरण समजावून घेण्यासाठी समाजा लाखोच्या संख्येने उपस्थित राहणार असल्याचा विश्वास ठिकठिकाणी जनतेने दिला आहे, ◀◀ पान २ वर

# पूरग्रस्त राजापूरकरांना डॉ.राम धुमक यांच्याकडून मदतीचा हात

तलवाडा । प्रतिनिधी

राजापूर गावाला पुराच्या पाण्याने वेढा घातला होता याठिकांचा संपर्क तुटल्याने त्यांना स्थलांतर होण्याची वेळ आली होती,घरात,दरात,आणि गावात पाणी गेल्याने अन्न,पाणी याची समस्या उभी होती याची जाणीव तलवाडा येथील उच्चशिक्षित डॉ.राम धुमक यांनी मनात ठेवत माणुसकीची जपली असून राजापूर येथील नागिकांना पिण्याच्या एक हजार बॉटल वाटप केल्या आहेत.यांचा आदर्श घेऊन समाज बांधवांनी



पूरग्रस्त भागात मदतीसाठी पुढे यावे अशी चर्चा होत आहे.

गोदाकाठच्या गावात आणि घरात पुराचे पाणी शिरल्याने तेथील जनजीवन विस्कळीत झाले होते आता पाणी हळूहळू कमी होत असून नागरिकांचे जनजीवन हळूहळू पूर्ववत होत आहे मात्र पुराच्या पाण्यामुळे विहिरी, बोर,चे पाणी सध्या खराब झाले आहे त्यामुळे या गावात ◀◀ पान २ वर

# म्हाळसजवळा रोहयो कामांवर चौकशीचा बडगा

## ज्ञानेश्वर खांडे यांच्या तक्रारीनंतर मंत्र्यांचा थेट आदेश!

बीड । प्रतिनिधी

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या अनुषंगाने शिवसेना उपजिल्हाप्रमुख श्री. ज्ञानेश्वर रामेश्वर खांडे पाटील, मौजे म्हाळसजवळा ता. जि. बीड यांच्याकडून रोहयो मंत्री भरत शेठ गोगावले यांच्याकडे लेखी तक्रार देण्यात आली होती.



म्हाळस जवळा येथील रोहयो कामाची सबंधित तक्रार देण्यात आली होती.

उपरोक्त तक्रारीच्या अनुषंगाने शासनाच्या प्रचलित नियम व धोरणानुसार सदर अर्जावर उचित कार्यवाही करावी व सदर तक्रारीचा त्वरीत निपटारा करावा. तसेच केलेल्या कार्यवाहीबाबत तक्रारदारास परस्पर कळवून केलेल्या कार्यवाहीचा अहवाल शासनास टपाली सादर करावा. असे अप्पर सचिव मळेकर यांच्या सहीने आदेशाचे पत्र रोहयो आयुक्त, बीड जिल्हाधिकारी, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी यांना देण्यात आले आहे.म्हाळस जवळा येथील पाणंद रस्ते, खडीकरण व इतर सर्व ५४ सार्वजनिक कामांची चौकशी लावण्यासंदर्भात उपजिल्हाप्रमुख ज्ञानेश्वर खांडे यांनी रोहयो मंत्री भरत शेठ गोगावले यांची भेट घेऊन तक्रार दिली होती. या तक्रारीची दखल तत्काळ घेण्यात आली आहे.

# प्रशिक्षणातील शिक्षणाचा लाभ उमेदवाराने पोलीस भरतीसाठी घ्यावा -विजय पेंडलवार

बीड । प्रतिनिधी

अल्पसंख्यांक पोलीस शिपाई भरतीपूर्व प्रशिक्षण शासन मान्यतेने बीड जिल्यासाठी आझाद हिंद सेवाभावी संस्था बीड येथे ५० उमेदवारासाठी चालू असून जिल्हा अल्पसंख्यांक अधिकारी मा सुधाकर चिंचाने यांनी सूचित केल्या नुसार केंद्राची तपासणी करून मुला-मुलींना पोलिसभर्ती साठी उपयुक्त पुस्तिकेचे मोफत वाटप सहायक बीड जिल्हा अल्पसंख्यांक अधिकारी मा.



विजय पेंडलवार व नितीन सांगुळे, संस्थेचे सचिव शेख मुसा यांच्या हस्ते वाटप करण्यात आले.यावेळी उमेदवारांनी प्रशिक्षनातील शिक्षणाचा येणाऱ्या पोलीस भरतीसाठी लाभ घेऊन जिल्हाचे व संस्थेचे नाव करावे असे आवाहन विजय पेंडलवार यांनी केले.तसेच उमेदवार यांच्या फीडब्याक नुसार विषयवर शिक्षकांनी अभ्यासक्रम पूर्ण केल्या बद्दल तथा पेठ परीक्षा उत्तीर्ण झाल्याबद्दल सय्यद वसीम, शेख रज्जक, शेख मोहसीन ग्राउंड कोच रीळ सय्यद मुक्तार, शेख फैसल इझशव तथा शनिवार, रविवार शेख शोएब जिल्हा वक्फ ऑफिसर छ. संभाजीनगर (औरंगाबाद )यांनी मुलांना गणिताचे सखोल तासिका घेऊन मोफत ◀◀ पान २ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist. Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske (mokashe) Executive Editor Subhash Vilasrao Chaure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# ज्येष्ठ नागरिक हे आपल्या समाजाचे आधारस्तंभ, त्यांच्या अनुभव सर्वांसाठी प्रेरणादायी - उप आयुक्त ममता शिंदे

## जागतिक ज्येष्ठ नागरिक दिनानिमित्त पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने विशेष कार्यक्रम संपन्न

पिंपरी । प्रतिनिधी

ज्येष्ठ नागरिक हे आपल्या समाजाचे आधारस्तंभ आहेत. त्यांच्या अनुभवाचा, ज्ञानाचा आणि जीवनमूल्यांचा वारसा आपल्यासाठी प्रेरणादायी ठरतो. आजच्या पिढीने त्यांच्याकडून जीवनातील शिस्त, संयम, संघर्षाची ताकद आणि सकारात्मकतेचा वारसा घ्यावा, हीच खरी कृतज्ञता ठरेल. महापालिकेच्या माध्यमातून ज्येष्ठ नागरिकांसाठी विविध सुविधा, आरोग्यविषयक उपक्रम आणि मनोरंजनात्मक कार्यक्रम राबविण्यात येतात. ज्येष्ठांचा सन्मान हा फक्त एका दिवसापुरता मर्यादित नसून, तो आपल्या दैनंदिन आचरणाचा भाग असायला हवा. त्यांच्या आशिर्वादानेच समाज अधिक बळकट होतो, त्यांच्या आनंदी आणि निरोगी जीवनासाठी आपण सर्वांनी मिळून प्रयत्न करणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन महापालिका समाज विकास विभागाच्या उप आयुक्त ममता शिंदे यांनी केले.

चिंचवड येथील प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृहात आज जागतिक ज्येष्ठ नागरिक दिनानिमित आयोजित कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी उप आयुक्त ममता शिंदे बोलत होत्या.या कार्यक्रमास सहाय्यक आयुक्त परशुराम वाघमोडे, माजी महापौर उषा उर्फ माई ढोरे, माजी नगरसदस्य उषा मुंढे, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक, पोलीस अधीक्षक कार्यालयातील ज्येष्ठ नागरिक कक्षाचे पोलीस निरीक्षक दिनकर गावडे, पिंपरी चिंचवड शहर ज्येष्ठ नागरिक महासंघाच्या अध्यक्षा वृषाली मरळ, सहाय्यक समाज विकास अधिकारी संतोषी चोरगे, समाजसेवक अनिकेत सातपुते, रेश्मा पाटील, विशाल शेडगे, मनोज मरगडे यांच्यासह ज्येष्ठ नागरिक संघाचे पदाधिकारी आणि शहरातील अनेक ज्येष्ठ नागरिक उपस्थित होते.



याप्रसंगी बोलताना माजी महापौर माई ढोरे म्हणाल्या की, शहराच्या जडणघडणीत ज्येष्ठ नागरिकांचे मोलाचे योगदान आहे. त्याचीच परतफेड म्हणून महापालिका ज्येष्ठ नागरिकांना अनेक सुविधा उपलब्ध करून देते. ज्येष्ठ नागरिक भवन उभारणीस परवानगी देणारी पिंपरी चिंचवड महानगरपालिका देशात पहिली आहे.ज्येष्ठ नागरिक महासंघाच्या अध्यक्षा वृषाली मरळ म्हणाल्या की, शहरात १६३ ज्येष्ठ नागरिक संघ आहेत. पालिकेच्या वतीने दरवर्षी संघांना विविध भेटवस्तू दिल्या जातात. यावर्षी देखील १४३ संघांसाठी समई आणि खुर्च्या उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. पालिकेच्या अशा सहकार्यामुळे ज्येष्ठांचा आत्मविश्वास वृद्धिंगत होत असल्याचे ही त्यांनी सांगितले.महानगरपालिका आयुक्त तथा शेखर सिंह, अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली समाज विकास विभागामार्फत दरवर्षी १ ऑक्टोबर हा जागतिक ज्येष्ठ नागरिक दिन साजरा केला जातो. या कार्यक्रमामध्ये ज्येष्ठांचा सन्मान केला जातो. यावर्षी पिंपरी चिंचवड शहर ज्येष्ठ नागरिक महासंघाच्या २७ पदाधिकाऱ्यांचा सन्मान करण्यात आला. तसेच 'आनंद मेळावा' या विशेषांकाचे प्रकाशनही मान्यवरांच्या हस्ते झाले.कार्यक्रमात ज्येष्ठांसाठी सांस्कृतिक कार्यक्रम, आरोग्यविषयक तज्ज्ञांचे व्याख्यान आणि मार्गदर्शन आयोजित करण्यात आले होते. आरोग्य फाउंडेशनचे श्रीकांत आपटे यांनी स्वस्थ नारी – सशक्त परिवार अभियानांतर्गत अवयवदान विषयावर प्रबोधनपर व्याख्यान दिले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक उप ममता शिंदे यांनी तर सूत्रसंचालन जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांनी केले.

## काशेवाडीत हजारो महिलांचा महाआरती जागर; सोन्याची जेजुरी देखाव्याने वेधले लक्ष



पुणे । प्रतिनिधी

नवरात्रोत्सवाच्या मंगल वातावरणात काशेवाडीत महिलांसाठी आयोजित भव्य महाआरतीत हजारो महिला सहभागी झाल्या. अशोक तरुण मंडळ व संयुक्त अण्णाभाऊ साठे मित्र मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने नगरसेविका अर्चनाताई तुषार पाटील यांच्या वतीने हा सोहळा पार पडला.

या कार्यक्रमाला पुणे शहराचे पोलीस आयुक्त अमितेश कुमार विशेष उपस्थित होते. प्रभागातील एक हजारहून अधिक महिलांनी महाआरतीत उत्साहाने सहभाग घेतल्याने परिसर भक्तिमय झाला.

कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण सोन्याची जेजुरी या संकल्पनेवर आधारित सादर केलेला देखावा ठरला. या भव्य व कलात्मक देखाव्याने नागरिकांचे लक्ष वेधून घेतले.महिलांसाठी पारंपारिक वाणवाटपाचाही उपक्रम राबवण्यात आला. स्थानिक नागरिकांनी या संपूर्ण आयोजनाला उत्स्फूर्त प्रतिसाद देत समाधान व्यक्त केले. विजयादशमीच्या शुभेच्छांसह हा सोहळा काशेवाडीतील नवरात्रोत्सवाचा अविस्मरणीय भाग ठरला.

## जितो लेडीज विंग पुणेच्या अध्यक्षपदी एकता भन्साळी



पुणे । प्रतिनिधी

जैन इंटरनॅशनल ट्रेड ऑर्गनायझेशन (गखढज) लेडीज विंग पुणेच्या २०२५-२६ या कार्यकाळासाठी नवी कार्यकारिणी जाहीर झाली असून, संघटनेला नव्या ऊर्जा, दृष्टीकोन व नेतृत्वाची जोड मिळाली आहे. या कार्यकाळासाठी एकता भन्साळी यांची अध्यक्षा पदा साठी निवड करण्यात असून पूजा राठोड मुख्य सचिव पद भूषवतील.

त्याचबरोबर रीता जैन सचिव वंदना राठोड खजिनदार म्हणून निवड करण्यात आली आहे. त्यांच्या सोबत एक समर्पित व दूरदृष्टी असलेली समितीही कार्यरत होणार आहे. जितो लेडीज विंग कडून महिलांच्या सक्षमीकरणासाठी , सामाजिक व व्यावसायिक प्रगतीसाठी तसेच महिलांच्या सकारात्मक भविष्यासाठी नवे उपक्रम राबवले जातात.


नवनिर्वाचित अध्यक्षा एकता भन्साळी यांनी सांगितले की जितो लेडीज विंग पुणे ही फक्त एक संस्था नसून, ती महिलांच्या प्रगतीची चळवळ आहे. आमच्या कार्यकाळात आम्ही महिलांना सबलीकरणाच्या नव्या संधी देऊ, नावीन्यपूर्ण उपक्रम राबवू आणि संघटनेला नवे यशोशिखर गाठण्यास प्रवृत्त करू. समितीतील सहकाऱ्यांचा उत्साह आणि सदस्यांचा विश्वास हेच आमचे खरे बळ आहे.

आम्ही सर्व मिळून हा कार्यकाळ ऐतिहासिक घडवू, असा मला दृढ विश्वास आहे मला आहे. जितो संस्थेच्या निवेदनातही नमूद करण्यात आले की, नवीन नेतृत्वाखाली जितो लेडीज विंग पुणे भविष्यातही सामाजिक बांधिलकी, व्यावसायिक उत्कृष्टता आणि महिलांच्या प्रगती या तिन्ही आघाड्यांवर लक्षणीय ठसा उमटवेल.

## आळंदीत संत ज्ञानेश्वर महाराज संस्थान समितीवर राज्यातील पहिली 'महिला तक्रार निवारण समिती' स्थापन

आळंदी । प्रतिनिधी

संत श्री ज्ञानेश्वर महाराज संस्थान समितीच्या विश्वस्त ॲड. डॉ. रोहिणी पवार यांनी पुढाकार घेत देवस्थानवर महिला लैंगिक छळ प्रतिबंधक कायदा २०१३ अंतर्गत महिला तक्रार निवारण समिती (विशाखा समिती) स्थापन करण्यात आली आहे.



महाराष्ट्रात प्रथमच एखाद्या देवस्थानवर महिला लैंगिक छळ प्रतिबंधक कायदा २०१३ अंतर्गत महिला तक्रार निवारण समिती (विशाखा समिती) स्थापन करण्यात आली आहे.

ज्ञानेश्वर महाराज संस्थान समितीवर प्रथमच एका महिलेला विश्वस्त म्हणून संधी मिळाल्यानंतर, त्यांनी स्वतः कायदेतज्ज्ञ असल्याने सहकारी विश्वस्तांच्या मदतीने हा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला.समितीत एकूण ५ सदस्य असून समितीच्या अध्यक्षा म्हणून ॲड. रोहिणी पवार यांची निवड करण्यात आली आहे. या समितीमुळे देवस्थानाशी संबंधित महिला कर्मचारी व भक्तगण यांना न्याय व संरक्षण मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

संत श्री ज्ञानेश्वर महाराज संस्थान समितीच्या विश्वस्त ॲड. डॉ. रोहिणी पवार यांनी सांगितले की,कायद्याच्या तरतुदीनुसार, ज्या ठिकाणी दहा पेक्षा अधिक कर्मचारी कार्यरत असतात, त्या ठिकाणी महिला तक्रार निवारण समिती स्थापन करणे बंधनकारक आहे. मात्र राज्यातील बहुतांश देवस्थानांनी या बाबतीत आजवर उदासीनता दाखवली होती.

आळंदी देवस्थाने ही समिती स्थापन करून राज्यातील अन्य देवस्थान साठी पथदर्शी प्रयोग निर्माण केला आहे. पुढे जाऊन अन्य देवस्थान मध्येही अशाच प्रकारचे समिती नेमणे कायदेशीर कोणतीच अडचण नाही.मात्र भाविकांच्या आणि महिलांच्या सुरक्षात्मक दृष्टिकोनातून अशा प्रकारची कार्यवाही करणे देवस्थानांसाठी उचित राहणार आहे. महिलांच्या सुरक्षा न्याय हक्क याबाबत या कायद्याचा योग्य उपयोग होईल कोणावरही अन्याय होणार नाही.

## डॉ. रवींद्र खराडकर यांची आयईटीईच्या उपाध्यक्षपदी निवड

पुणे - जी.एच.रायसोनी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग,आणि मॅनेजमेंट पुणेचे कॅम्पस डायरेक्टर डॉ. रवींद्र खराडकर यांची नवी दिल्ली येथील इन्स्टिट्यूशन ऑफ इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअर्स (आयईटीई) च्या उपाध्यक्षपदी निवड झाली आहे. डॉ. खराडकर यांना आयईटीईचे वेस्ट झोन इंडिया मेंटर म्हणूनही नियुक्त केले आहे.



आयईटीई ही भारतातील आघाडीची व्यावसायिक संस्था आहे. भारतात आणि परदेशात १.५ लाखांहून अधिक सदस्य या संस्थेचे आहेत. या सदस्यांमध्ये शिक्षणतज्ज्ञ, उद्योगजक, शास्त्रज्ञ आणि विद्यार्थी आहेत. आयईटीई देशभरातील त्यांच्या ८० केंद्रांद्वारे सदस्यांना सेवा देते.


डॉ. खराडकर आयईटीई पुणे सेंटरचे अध्यक्ष होते. त्यांच्या कारकिर्दीत, त्यांनी तंत्रज्ञान, संशोधन, जागतिक नवतंत्रज्ञान आणि नवोपक्रमात असंख्य उपक्रमांचे नेतृत्व केले आहे. त्यांनी शैक्षणिक आणि उद्योगाची एकत्र सांगड घालत पूरक इकोसिस्टिम तयार केली आहे. शैक्षणिक संशोधनासाठी व्यासपीठ निर्माण केले आहे. खाजगी विद्यापीठे आणि संस्थांना उद्योगाधारित प्रकल्पांचा मेळ घालून संशोधन आणि नवोपक्रमात एक बेंचमार्क उभा केला आहे.

देशभरातील अभियंते आणि तंत्रज्ञांना सक्षम बनवण्याच्या संस्थेच्या दृष्टिकोनाला अधिक बळकटी देण्यासाठी प्रयत्न करत असल्याचे डॉ. खराडकर यांनी नमूद केले आहे. रायसोनी एज्युकेशनचे अध्यक्ष सुनील रायसोनी, कार्यकारी संचालक श्रेयश रायसोनी यांनी डॉ. खराडकर यांच्या निवडी बद्दल अभिनंदन केले.

## खडसेंच्या जावयावरील सर्वात मोठा कलंक फॉरेन्सिकने पुसला

पुणे: राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या नेत्या रोहिणी खडसे यांचे पती प्रांजल खेवलकर यांच्या खराडी ड्रग्स पार्टी प्रकरणात मोठी अपडेट समोर आली आहे. प्रांजल खेवलकर आणि इतर आरोपींनी अंमली पदार्थांचे सेवन केले नसल्याचा फॉरेन्सिकचा रिपोर्ट पोलिसांना प्राप्त झाला असल्याची माहिती समोर आली आहे. प्रांजल खेवलकर आणि इतर आरोपींची ड्रग्स पार्टी प्रकरणात फॉरेन्सिक चाचणी करण्यात आली होती. त्याचे रिपोर्ट पोलिसांना प्राप्त झाले आहेत. या प्रकरणात एकनाथ खडसेंचे जावई प्रांजल खेवलकर तब्बल दोन महिन्यांपेक्षा अधिक काळ जेलमध्ये होते. प्रांजल खेवलकर यांची येरवडा जेलमधून सुटका झाली आहे.

पुण्यातील खराडी परिसरात कथित ड्रग्ज पार्टी प्रकरणी प्रांजल खेवलकर (झीरपक्षरश्र घहशुरश्रज्ञरी) यांना २५ सप्टेंबर रोजी जामीन मंजूर करण्यात आला आहे. प्रांजल खेवलकर हे रोहिणी



खडसे यांचे पती आणि एकनात खडसे यांचे जावई आहेत. दीड महिन्यांपेक्षा अधिक वेळ प्रांजल खेवलकर तुरुंगात होते. त्यामुळं त्यांना मिळालेला जामीन मोठा दिलासा होता. खेवलकर यांच्यासह इतर आरोपींना देखील जामीन मंजूर करण्यात आला होता.

पुण्यातील खराडी भागातील एका पार्टीवर पोलिसांनी छापा टाकला होता. त्या पार्टीत अंमली पदार्थ पोलिसांनी जप्त केले होते. त्या पार्टीत काही महिला देखील होत्या. त्या पार्टीमध्ये काही प्रमाणात अंमली पदार्थ देखील आढळले होते. अंमली पदार्थाचं सेवन प्रांजल खेवलकर यांनी केलं हा कळीचा मुद्दा होता. त्याच मुद्यावर त्यांना जामीन मिळालेला होता. दीड महिन्यांहून अधिक काळ तुरुंगात राहिल्यानंतर पुणे सत्र न्यायालयानं त्यांना जामीन मंजूर केला. दरम्यान प्रांजल खेवलकर आणि इतर आरोपींनी अंमली पदार्थांचे सेवन केले नसल्याचा फॉरेन्सिकचा रिपोर्ट पोलिसांना प्राप्त झाला असल्याची माहिती समोर आली आहे.


पुण्यातील खराडी भागात सुरु असलेल्या एका खोलीतील पार्टीवर पोलिसांनी २७ जुलै रोजी छापा टाकला होता. त्या कारवाईदरम्यान प्रांजल खेवलकर यांना अटक करण्यात आली होती. त्यानंतर प्रांजल खेवलकरांसह इतर आरोपींना पुणे सत्र न्यायालयाकडून जामीन मंजूर करण्यात आलेला आहे. प्रांजल खेवलकर सहभागी असलेल्या पुण्यातील पार्टीत अंमली पदार्थ सापडल्याने त्यांना अटक करण्यात आली होती. पुणे पोलिसांनी २७ जुलै रोजी छापा टाकून प्रांजल खेवलकर आणि इतर सात जणांना अटक केली होती. पोलिसांनी खराडीतील त्या खोलीत २५ जुलै रोजी देखील पार्टी झाल्याचा दावा केला होता.

प्रांजल खेवलकर हे एकनाथ खडसे यांचे जावई आणि राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाच्या प्रदेशाध्यक्षा रोहिणी खडसे यांचे पती असल्यानं या प्रकरणाची राज्यभरात चर्चा झाली होती. यामुळे राजकीय वातावरण देखील मोठ्या प्रमाणावर तापल्याचं पाहायला मिळालं होतं, त्यानंतर प्रांजल खेवलकर यांच्या संदर्भात बीडच्या एका स्वयंसेवी संस्थेच्यावतीनं राज्य महिला आयोगाकडे तक्रार दाखल करण्यात आली होती. त्यानंतर राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांनी प्रांजल खेवलकर यांच्यावर आरोप केले होते.

## साडेपाच कोटींची खंडणी उकळल्याप्रकरणी बंडू आंदेकर टोळीवर गुन्हा दाखल

पुणे । प्रतिनिधी

कुख्यात बंडू आंदेकर टोळीने जमिनीवर कब्जा करून पाच कोटी ४० लाख रुपयांची खंडणी उकळल्याचे समोर आले आहे. या प्रकरणी समर्थ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.



बंडू आंदेकर आणि त्याच्या हस्तकांनी कोणावर अत्याचार, जमिनीवर कब्जा किंवा खंडणी मागितली असल्यास नागरिकांनी पुढे यावे, असे आवाहन पोलिस आयुक्त अमितेश कुमार यांनी केले होते. या आवाहनानंतर एका व्यक्तीने गुन्हे शाखेत याबाबत तक्रार दिली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, बंडू आंदेकर आणि त्याचा साथीदार मनीष ऊर्फ मनोज वर्देकर याने तक्रारदाराची नाना पेठेतील जमीन संगनमताने बळकावली. कोणताही मालकी हक्क नसताना त्यांनी बेकायदेशीर बांधकाम केले. भाडेकरूंकडून आणि परिसरातील मोकळ्या जागेतून आजवर पाच कोटी ४० लाख रुपये खंडणीच्या स्वरूपात वसूल केले.तक्रारदाराने बांधकामासाठी जमीन रिकामी करण्याची विनंती केली असता आंदेकरने दोन दुकाने किंवा दीड कोटी रुपये आणि महापालिकेतील काम पुढे नेण्यासाठी ३० लाख रुपयांची खंडणी मागितली. अन्यथा काम करण्यास अडथळा आणून जीवे मारण्याची धमकी दिली.या तक्रारीनुसार पोलिसांनी आंदेकर टोळीवर गुन्हा दाखल केला. पोलिस आयुक्त अमितेश कुमार, पोलिस सहआयुक्त रंजनकुमार शर्मा, अतिरिक्त आयुक्त पंकज देशमुख, पोलिस उपायुक्त निखिल पिंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली. पुढील तपास वरिष्ठ निरीक्षक उमेश गित्ते करीत आहेत.

## मगरपट्टा परिसरातील अनधिकृत कॉल सेंटरवर छापा; चालक-मालकांसह ३२ कर्मचारी ताब्यात



पुणे - अमेरिकन नागरिकांची लाखो रुपयांची फसवणूक करणाऱ्या मगरपट्टा रस्त्यावरील अनधिकृत कॉल सेंटरवर छापा टाकून पोलिसांनी मुख्य चालक-मालकांसह ३२ जणांना ताब्यात घेतले आहे. गुन्हे शाखेच्या युनिट ५ च्या पथकाने केलेल्या या कारवाईत बुधवारी (ता. ३०) मार्वल फिगो इमारतीमधील तीन कार्यालयांमधून १५ लाख ७७ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

मगरपट्टा परिसरातील मार्वल फिगो इमारतीमध्ये कॉल सेंटरमधून नागरिकांची फसवणूक होत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानंतर पोलिस आयुक्त अमितेश कुमार, पोलिस सहआयुक्त रंजनकुमार शर्मा, गुन्हे शाखेचे अतिरिक्त पोलिस आयुक्त पंकज देशमुख, पोलिस उपायुक्त निखिल पिंगळे आणि सहाय्यक आयुक्त राजेंद्र मुळीक यांच्या सूचनेनुसार ही कारवाई करण्यात आली.

या प्रकरणी हडपसर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कॉल सेंटरचे चालक-मालक निर्मल अजय शहा (वय ३८, रा. कुमार पिकासो सोसायटी, हडपसर), अतुल प्रवीण श्रीमाळी (वय ३०, रा. लेबरनम पार्क सोसायटी, मगरपट्टा) आणि युगंधर संजय हादगे (वय ३४, रा. शिवकृष्ण हाउसिंग सोसायटी, मांजरी बुद्रूक) अशी गुन्हा दाखल केलेल्या संशयितांची नावे आहेत. पोलिसांनी कॉल सेंटरमधील २९ कर्मचाऱ्यांसह ३२ जणांना ताब्यात घेतले असून, इतर दोघांचा शोध सुरू आहे.

## सफाई सेवकांच्या आरोग्य व सुरक्षेची काळजी घेण्यास महापालिकेचे प्राधान्य -अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे

पिंपरी । प्रतिनिधी

पिंपरी चिंचवड शहर सुंदर व स्वच्छ ठेवण्यात सफाई सेवकांचा मोलाचा वाटा आहे. ते शहराच्या स्वच्छतेचे खरे शिल्पकार असून त्यांच्या आरोग्य व सुरक्षेची काळजी घेण्यासाठी पिंपरी चिंचवड महापालिका प्राधान्य देत असते. याच हेतूने आज 'सफाई मित्र सुरक्षा शिबिराचे' आयोजन करण्यात आले आहे, असे प्रतिपादन महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे यांनी केले.

राष्ट्रपिता महात्मा गांधी जयंतीनिमित्त 'स्वच्छता ही सेवा - २०२५' पंधरवड्यांतर्गत महापालिकेकडून आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह, अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे यांच्या मार्गदर्शनाखाली व उपायुक्त सचिन



पवार यांच्या अधिपत्याखाली स्वच्छता सेवकांच्या आरोग्य व सुरक्षेसाठी विविध उपक्रम राबवले जात आहेत. त्याचाच एक भाग म्हणून थेरगाव येथील स्व. शंकरराव गावडे कामगार भवन येथे 'सफाई मित्र सुरक्षा शिबिर' मोठ्या उत्साहात पार पडले. या शिबिराचे उद्घाटन अतिरिक्त आयुक्त खोराटे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ते बोलत होते.

अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे पुढे म्हणाले, सफाई मित्रांच्या कल्याणासाठी महापालिका प्रशासन कटिबद्ध आहे. त्यांच्यासाठी महापालिकेच्या वतीने विविध योजना राबवल्या जात आहेत. या योजनांचा लाभ सफाई सेवकांना मिळावा, यासाठी सातत्याने महापालिकेकडून वेगवेगळे उपक्रम राबवले जात असतात. याशिवाय सफाई सेवकांची नियमित वैद्यकीय तपासणी करणे, त्यांना प्रशिक्षण देणे, त्यांना कामाच्या ठिकाणी सुरक्षिततेसाठी आवश्यक साधने उपलब्ध करून देणे, यावर देखील भर दिला जात आहे, असेही त्यांनी सांगितले. याप्रसंगी महापालिकेचे आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफणे, उपायुक्त सचिन पवार, क्षेत्रीय अधिकारी किशोर ननवरे, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक, थेरगाव रुग्णालयाचे डॉ. राजेंद्र फिरके, डॉ. लक्ष्मीकांत अत्रे, डॉ. संजय सोनेकर, डॉ. शंकर मोसलगी यांच्यासह महापालिकेचे सहाय्यक आरोग्य अधिकारी सुधीर वाघमारे, शांताराम माने, राजू साबळे, कुंडलिक दरवडे, महेश आढाव आदी उपस्थित होते.

शिबिरामध्ये नवीन थेरगाव, तालेरा, आकुर्डी, सांगवी, जिजामाता, यमुनानगर, भोसरी व वायसीएम रुग्णालयातील तज्ज्ञ डॉक्टरांनी सफाई सेवकांची तपासणी केली. यामध्ये रक्त तपासणी, निमिया, हिमोग्लोबिन, हृदयविकार, मधुमेह, कॅल्शियम, हायपरटेन्शन आदींची तपासणी करून मोफत औषध वितरण करण्यात आले. शिबिरात तब्बल २ हजारांहून अधिक सफाई सेवकांची मोफत आरोग्य तपासणी करण्यात आली.